रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३४७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, शुक्रवार, दि. २४ मे २०२४

किंमत ४₹

## ॲमेझॉनच्या कर्मचाऱ्याचा कारनामा

**सायबराबाद :** ॲमेझॉन कंपनीमध्ये काम करणाऱ्या एका कर्मचाऱ्याने नको तिथे चलाखी दाखवत कंपनी सोडणाऱ्या कर्मचाऱ्यांना गंडा घालून कोट्यवधी रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. कंपनीने या कर्मचाऱ्याकडे ज्या कर्मचाऱ्यांना पैसे वाटप करण्याची जबाबदारी सोपवली होती. त्यानेच त्या कर्मचाऱ्यांच्या खात्यांमधील रकमेवर डल्ला मारला. त्याने एक दोन नव्हे तर तर तब्बल २०० लोकांना आपली शिकार बनवलं आणि कोट्यवधी रुपयांची माया गोळा केली. तब्बल ८ वर्षे हेराफेरीचा हा खेळ सुरू होता.

## रेवन्नाला देवेगौडांचा इशारा

**कर्नाटक :** कर्नाटकातील हसन लोकसभा मतदारसंघातील जेडीएसचे खासदार प्रज्वल रेवन्ना गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आले आहेत. त्यांच्याविरोधात घरात काम करणाऱ्या महिलांनी लैंगिक अत्याचारी तक्रार दाखल केली आहे. ही तक्रार दाखल झाल्यापासून ते परदेशात पळून गेले आहेत. आता या प्रकरणात माजी पंतप्रधान आणि प्रज्वल यांचे आजोबा एचडी देवेगौडा यांनी उडी घेतली आहे. देवेगौडा यांनी प्रज्वल रेवन्ना याला लवकरात लवकर भारतात परतण्याचा इशारा दिला आहे.

## भीषण स्फोट, धुराचे लोट

# डोंबिवली हादरली



### सात कामगारांचा मृत्यू, ४८ जखमी

**| कल्याण| प्रतिनिधी |**

**डोंबिवली एमआयडीसीतील अंबर केमिकल कंपनीत गुरुवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास बॉयलरचा भीषण स्फोट झाला. या स्फोटात कंपनी बेचीराख झाली असून सात कामगारांचा होरपळून मृत्यू झाला. तर ४८ जण जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी आगीचे लोळ आणि धुराचे लोट मोठ्या प्रमाणावर येत होते. या दुर्घटनेतील मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणी चौकशीचे आदेश दिले आहेत.**

स्फोटामुळे डोंबिवली परिसर हादरुन गेला होता. स्फोटाची भीषणता इतकी होती की, परीसरातील २-३ किलोमीटरपर्यंत इमारतींना हादरे बसले तर काही इमारतींच्या खिडक्यांच्या काचा फुटल्या. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. घटनास्थळी डोंबिवली अग्निशामक

पान २ वर

> अंबर केमिकल दुर्घटनेची चौकशी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या दुर्घटनेत जखमी झालेल्या लोकांवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. घटनास्थळी अग्निशमन दल तसेच वैद्यकीय पथक दाखल झाले आहे. सध्या बचावकार्याला प्राथमिकता देण्यात आली असून, त्यानंतर या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

> डोंबिवली येथील दुर्घटनास्थळी भेट देऊन मदतकार्याचा आढावा घेतला. या दुर्घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च सरकारतर्फे करण्यात येणार आहे. या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी केली जाईल.
> –उदय सामंत, उद्योग मंत्री

### ९ वर्षांपूर्वीच्या स्फोटाची आठवण

**२६ मे २०१६ रोजी प्रोबेस कंपनीत स्फोट झाला होता. या घटनेची तीव्रता अधिक असल्याने कंपनीत काम करणाऱ्या १२ जणांना आपला जीव गमवावा लागला होता. तर, आजुबाजूच्या परिसरात राहणाऱ्या २१५ जणांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते. त्यावेळी, कल्याण तहसीलदारांकडून २६६० नुसार बाधितांच्या मालमत्तेचे नुकसान झाले होते.**

## इंडिया आघाडीचे सरकार आल्यास

# इलेक्टोरल बॉण्डचा तपास करणार

### अरविंद केजरीवाल यांचा इशारा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

दिल्ली मद्य घोटाळ्याप्रकरणी अटकेत असलेल्या मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी सशर्त अंतरिम जामीन मंजूर केला. यानंतर अरविंद केजरीवाल यांनी जोरदार प्रचाराला सुरुवात केली असून, भाजपा आणि केंद्रातील मोदी सरकारवर सडकून घणाघात करताना दिसत आहेत. केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार आल्यास पहिल्या शंभर दिवसांत इलेक्टोरल बॉण्डमधून देण्यात आलेल्या देणगीचा तपास केला जाईल, असे अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे.

दिल्लीत मोठ्या प्रमाणावर प्रचार करत आहे आणि पंजाब, कुरुक्षेत्र, भिवंडी, मुंबई, लखनऊ आणि जमशेदपूर येथेही जाऊन आलो. खूप लोकांशी बोललो आहे. महागाई आणि बेरोजगारीमुळे प्रचंड त्रास आणि संताप जनतेत आहे. पंतप्रधान त्यावर बोलत नाहीत. मुंबईत ते म्हणाले की, शरद पवार भटकती आत्मा आहेत, उद्धव ठाकरे हे त्यांच्या वडिलांचे खोटे अपत्य आहेत.

इंडिया आघाडी तुमचे मंगळसूत्र हिसकावून घेईल. लोकांना त्यांच्या समस्या सोडवायला हव्या आहेत पण खऱ्या प्रश्नांवर ते बोलत नाहीत, या शब्दांत अरविंद केजरीवाल यांनी हल्लाबोल केला. आम आदमी पक्षासाठी सत्ता महत्त्वाची नाही आम आदमी पक्षासाठी सत्ता महत्त्वाची नाही. सरकारमध्ये राहिलो की, बाहेर हे महत्त्वाचे नाही. हे येणारा काळच ठरवेल.



महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या सर्व गॅरंटी पूर्ण केल्या जातील, याची गॅरंटी देतो. या गॅरंटी सर्वसामान्यांच्या जीवनात महत्त्वाच्या आहेत, असे अरविंद केजरीवाल यांनी म्हटले आहे. तसेच भाजपा सत्तेत परत आल्यास निवडणुका होणार नाहीत किंवा रशिया, बांगलादेश आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या निवडणुकांप्रमाणेच होतील, असा दावा अरविंद केजरीवाल यांनी केला. दरम्यान, राजीनामा देण्याचा कोणताही विचार नाही. त्यांनी लोकशाहीला तुरुंगात डांबले तर तुरुंगातून लोकशाही कशी चालवायची ते दाखवून देऊ, असा एल्गार अरविंद केजरीवाल यांनी केला.

**आजचा अग्रलेख**

**संघाला बुक्क्यांचा मार**

**वे|ध|क**

## रिक्षा अपघातात महिलेचा मृत्यू

**पनवेल :** हरिग्राम ते केवाळे या मार्गावरुन भरधाव वेगाने घेवून जाणाऱ्या रिक्षा चालकाने वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षातील एकीचा मृत्यू झाला आहे तर दोघी जणी जखमी झाल्या आहेत. रिक्षा चालक हा हरिग्राम ते केवाळे मार्गे चालला असताना त्याचा रिक्षावरील ताबा सुटून त्याने वॉल कंपाऊंडला धडक दिल्याने झालेल्या अपघातात रिक्षा प्रवासी नागूबाई भगत (५९) हा गंभीररित्या जखमी मृत्यू झाल्या आहेत. तर इतर दोन प्रवासी जखमी झाले आहेत.

## रिक्षा चालकाची आत्महत्या

**पनवेल :** राहत्या घरात असलेल्या किचनमधील लोखंडी पाईपला गळफास घेवून रिक्षा चालकाने आत्महत्या केल्याची घटना पनवेल शहरात घडली. जयेश यादव (३३) असे या रिक्षा चालकाचे नाव असून त्याने आपल्या राहत्या घरात असलेल्या घरातील किचनमधील लोखंडी पाईपला अज्ञात कारणावरुन गळफास लावून घेवून आत्महत्या केली आहे.

## पाताळगंगेत बुडून एकाचा मृत्यू

**| रसायनी | वार्ताहर |**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एमआयडीसी हद्दीत कराडे खुर्द गावच्या हद्दीमध्ये पाताळगंगा नदी पात्रात एका ५८ वर्षीय व्यक्तीचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली असून याबाबत प्रकाश काशिनाथ माळी यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली आहे. कुमार बाबू आवळे (वय ५८, रा. रोहिदास रहिवासी संघ, बांदेकर गल्ली, श्रीरंग मावडे मार्ग, लिंक रोड, बिबग्योर स्कूल जवळ, भगतसिंग नगर, गोरेगाव-मुंबई) येथील असून चावंढोली स्मशानभूमीच्या बाजूला असलेल्या दिवटा नावाच्या जागेमध्ये वीटभट्टीच्या पुढे असलेल्या पाताळगंगा नदीच्या पात्रात कुमार बाबू आवळे याचा मृतदेह मिळून आला. त्यास शवविच्छेदनासाठी ग्रामीण रूग्णालय चौक येथे पाठविण्यात आले आहे. याबाबत सीआरपीसी १७४ प्रमाणे अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली असून रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोसई मिनल शिंदे अधिक तपास करीत आहेत.

## उजनी धरणात बुडालेल्या सहा जणांचे मृतदेह सापडले

**| इंदापूर | वार्ताहर |**

उजनी धरणाच्या जलाशयामध्ये बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत बुडालेल्या सहा जणांचे मृतदेह शोधण्यात आज सकाळी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाला यश आले. मात्र त्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. दुर्घटनेच्या तिसऱ्या दिवशी सकाळपासून बुडालेल्या व्यक्तींचा शोध घेण्याची मोहीम सुरू करण्यात आली होती.ज्या ठिकाणी बोट

पान २ वर

# एसडीआरएफची बोट उलटून तिघांचा मृत्यू

**| अहमदनगर | वृत्तसंस्था |**

सोलापूर जिल्ह्यातील उजनी जलाशयात प्रवाशी बोट बुडाल्याची घटना ताजी असतानाच अहमदनगर जिल्ह्यातील अकोले येथे प्रवरा नदीत एसडीआरएफची बोट उलटण्याची दुर्घटना घडली आहे. या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला असून दोघांचा शोध सुरू आहे. प्रवरा नदीत काल दोन तरुण बुडाले असल्याची माहिती मिळाली. त्यापैकी एका तरुणाचा मृतदेह आढळून आला तर दुसऱ्या तरुणाचा शोध सुरू होता. या शोधकार्यादरम्यान एसडीआरएफची



बोट उलटली आणि तीन जवानांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

प्रवरा नदी पिण्याच्या पाण्यासाठी आवर्तन सोडण्यात आले आहे. उकाड्याने त्रस्त झालेले अनेकजन या पाण्यात पोहण्याचा आनंद घेण्यासाठी जात आहेत. अहमदनगरच्या अकोले तालुक्यातील सुगाव मधील रोपवाटीकेजवळील पात्रात दोन युवक पोहण्यासाठी प्रवरा नदीत उतरले होते. यावेळी पाण्याचा खोलीचा अंदाज न आल्याने पोपट जेडगुले (वय २५), अर्जून रामदास जेडगुले (वय १८) या दोघांचा बुडून मृत्यू झाला.

कर्जत-जामखेडचे आमदार रोहित पवार यांनीही आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. ते म्हणाले, उजनी धरणात बोट बुडाल्याने बेपत्ता झालेल्या पाच जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त दुखःद आहे. प्रवरा नदीत बोट उलटून एसडीआरएफच्या बचाव पथकातील तीन जवानांचा मृत्यू झाल्याची बातमीही अत्यंत धक्कादायक आणि दुःखद आहे.

# काँग्रेस आमदार पी. एन. पाटील यांचं निधन

**| कोल्हापुर | वृत्तसंस्था |**

काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष आणि करवीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार पी. एन. पाटील यांचं निधन झालं. पहाटे खासगी रुग्णालयात उपचारांदरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. वयाच्या ७१ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गांधी घराण्याचे विश्वासू अशी त्यांची ओळख होती. दिवंगत नेते विलासराव देशमुख यांचेही खंदे समर्थक म्हणून पाटील ओळखले जात होते. रविवारी राहत्या घरातल्या बाथरुममध्ये ते पाय घसरुन पडले आणि त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र उपचारांदरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली.

**कोल्हापूर लोकसभेला काँग्रेसकडून श्रीमंत छत्रपती शाहू महाराज निवडणुकीच्या रिंगणात असल्याने आमदार पी. एन. पाटील यांनी करवीर मतदारसंघासह जिल्ह्यात झंझावाती प्रचार केला होता. मतदारसंघातील प्रचाराची धुरा एकहाती सांभाळली होती.**



पी. एन. पाटील रविवारी सकाळी साडे आठ सुमारास घरी चक्कर येऊन बाथरुममध्ये पडले. यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर त्यांचे एमआरआय स्कॅन करण्यात आलं. ज्यामुळे पाटील यांच्या मेंदूत रक्तस्त्राव झाल्याचं लक्षात आले.

त्यांना तातडीने आधार रुग्णालयात दाखल करण्यात आलं आणि त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, त्यांच्या मेंदूची सूज कायम होती. त्यामुळे तुलनेत प्रकृती स्थिर असली तरी गंभीर होती. त्यांच्या दीर्घायुष्यासाठी कार्यकर्त्यांकडून प्रार्थना सुरु होती.

# उमटे धरण संघर्ष ग्रुपने मानले प्रशांत नाईक, चित्रलेखा पाटील यांचे आभार

## पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त गाळ काढण्याचे दिले आश्वासन



चित्रलेखा पाटील यांनी केली उमटे धरणाची पाहणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

उमटे धरणातील गाळ कित्येक वर्ष काढण्यात आला नव्हता. त्यामुळे तालुक्यातील ४४ गावातील नागरिकांना ३३ वाड्यांना दूषित पाण्याचा पुरवठा होत होता. महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती, तसेच येथील पर्यटन व्यवसायावर देखील विपरीत परिणाम होत असल्याने यातून मार्ग काढावा अशी विनंती उमटे धरण संघर्ष ग्रुप तसेच धरण परिसरातील स्थानिकांनी शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई, अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांच्याकडे केली होती.

शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी पिण्याच्या पाण्यासाठी पाठपुरावा घेत मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांची २९ एप्रिल रोजी भेट घेतली होती. नागरिकांना शुध्द पाणी द्या, शासनामार्फत धरणातील गाळ काढा अन्यथा आम्हाला तो गाळ काढण्यासाठी सेंटर

पान २ वर

> उमटे धरणाचा गाळ काढण्याच्या बाबतीत पाणीपुरवठा विभाग अपयशी ठरला आहे. उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या नागरिकांना तसेच सर्वच राजकीय नेत्यांना,सर्व ग्रामपंचायतींना जाहीर आवाहन करतो की, धरणाचा गाळ काढण्यासाठी पैसे नका देऊ पण पोकलन, डंपर,जेसीबी ची मदत देऊन आपण खारीचा वाटा उचलून आमच्या संघर्षाला मदत करावी.
> – ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप

> जनतेला हक्काचे शुद्ध पाणी मिळवून देण्याच्या या लढ्यामध्ये कोणीही राजकारण करू नये आपण जर सर्वजण एकत्र राहिलो तर या अशा कठीण परिस्थितीवर नक्कीच मात करू शकतो. मला सर्वांना आवाहन करायचे आहे की,जसे आम्ही गाळ काढण्यासाठी खारीचा वाटा उचलला आहे तसे इतरांनी सुद्धा पोकलेन, डंपर, जेसीबी इतर यंत्रसामुग्री देऊन हातभार लावावा आणि हा गाळ काढण्यासाठी प्रयत्न करावेत.
> –चित्रलेखा नृपाल पाटील उर्फ चिऊताई, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख



आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# भातशेतीसाठी सुधारित चतु:सूत्री वरदान

**। पाली । वार्ताहर ।**

जिल्ह्यात सर्वत्र भातशेतीची पूर्व मशागत करण्यास बळीराजाची लगबग आता सुरु झाली आहे. भात शेती पुर्व मशागतीसाठी सुधारित चतु:सूत्री वरदान ठरत आहे. ज्यामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच उत्पादनदेखील चांगले मिळते. मात्र भात शेतीत अजूनही पारंपरिक राब भाजण्याच्या पद्धतीचाच वापर सुरु आहे. मशागतीची ही पद्धत अयोग्य असून या पद्धतीमुळे प्रदूषण वाढते, वेळ वाया जातो आणि झाडांचीही कत्तल होते.

भाताचे कोठार समजल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यात साधारण ९० हजार हेक्टरवर प्रत्यक्ष भाताची लागवड केली जाते. सध्या भातक्षेत्र घटत चालले आहे ही अतिशय चिंताजनक बाब आहे. जिल्ह्यात प्रती हेक्टरी सरासरी २६ ते २८ क्विंटल भाताचे उत्पादन घेतले जाते. परंतु अजूनही येथिल बहुतांश शेतकरी पारंपारिक पद्धतीने शेती करत आहेत. पूर्व मशागत करतेवेळी सर्रास राब / शेतीची भाजणी केली जाते. त्यासाठी शेण्या, पालापाचोळा, झाडांच्या सुक्या फांद्या व पेंढा यांचा वापर केला जातो.

सध्या जिल्ह्यात ठिकठिकाणी अशा पद्धतीने राब तयार करण्याची कामे सुरू आहेत. परंतु अशा प्रकारे राब भाजणे हि पद्धत अयोग्य आणि पर्यावरणास धोकादायक आहे. असे डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, यांनी केव्हाच संशोधन करून सांगितले आहे. तरी याबाबत कृषी कार्यालयाकडून शेतकर्यांचे प्रबोधन करुन त्यांना या संदर्भात फायदे तोटे सांगितले जातात मात्र यासाठी अजूनही मोठ्या प्रमाणात जनजागृती व प्रबोधनाची आवश्यकता आहे.



आधुनिक पद्धती बद्दल गैरसमज राब भाजले नाही तर शेतात तण वाढते अशी शेतकऱ्यांची धारणा आहे. तण नाशकाबद्दल गैरसमज असल्याने त्याचा वापर फारसा केला जात नाही. तण नाशकाची फवारणी करण्यापेक्षा जाळणे सोईचे वाटते. फवारणीसाठी मजुरीही द्यावी लागते म्हणून अधिक पैसे जातात असा गैरसमज आहे.

तण नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर भात पिकात प्रामुख्याने पाखड, धुर, बार्डी, लव्हाळा या तणांचा प्रदुर्भाव दिसुन येतो. रोपवाटीकेतील तणांच्या नियंत्रणासाठी कोकणात मराबफ भाजणे या पारंपारिक पद्धतीचा अवलंब प्रचलित आहे. मात्र हि पद्धत अत्यंत वेळ खाऊ, कष्टप्रद आणि खर्चिक असून पर्यावरणासाठी मारक आहे. शिवाय अशा कामासाठी मजुरांचा तुटवडा सुद्धा जाणवु लागला आहे. भात रोप वाटीकेतील तणांच्या नियंत्रणासाठी अलीकडे तणनाशकांचा वापरही परिणामकारकपणे करण्याचे किफायतशीर तंत्र विकसित करण्यात आले आहे.

राब भाजणीचे दुष्परिणाम राब केल्याने / शेतजमीन भाजल्याने तेथिल जमीनीतल शेतीसाठी उपयुक्त सुक्ष्मजीव नष्ट होतात परिणामी शेतीस पोषण व सेंद्रिय घटक मिळत नाही. तसेच राब भाजण्यासाठी झाडांची तोड होते. प्रदुषण वाढते परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडते. शेतकऱ्यांचा पैसा व श्रम अधिक लागतो. आवाहन व जनजागृती राब केल्याने किंवा शेतजमीन भाजल्याने तेथील जमिनीतील शेतीसाठी उपयुक्त सूक्ष्मजीव नष्ट होतात. परिणामी शेतीस पोषण व सेंद्रिय घटक मिळत नाही. तसेच राब भाजण्यासाठी झाडांची तोड होते. प्रदुषण वाढते परिणामी पर्यावरणाचे संतुलन बिघडते. त्यामुळे शेतकऱ्यांनी भात लागवडीसाठी चार सूत्री भातशेतीचा अवलंब करावा. तण काढण्यासाठी तणनाशकाचा वापर करावा. यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांना वेळोवेळी माहिती पुरविली जात आहे.

**सुधारीत पद्धत, चतु:सूत्री**

भात लागवड सुत्र - १ भातपिकाच्या अवशेषांच्या फेरवापर सुत्र - २ गिरीपुष्पाचा वापर सुत्र - ३ नियंत्रित लागवड सुत्र - ४ युरिया ब्रिकेटचा वापर

**चतु:सूत्रीचे भात शेतीचे फायदे**

हे तंत्रज्ञान सोपे, शास्त्रीयदृष्ट्या कार्यक्षम, एकुण लागवडीच्या (बी, मजूर व खत यांचा) खर्च कमी करणारे, वातावरणाचे प्रदूषण टाळणारे व भातशेती निश्चितपणे फायदेशीर करणारे आहे. छोटा शेतकरी खरीप,उन्हाळी हंगामात भाताचे सुधारित वाण वापरुन सरासरी ४० क्विंटल प्रती हेक्टर व संकरित भाताचे वाण वापरुन सरासरी ६० क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन घेऊ शकतो. असे कृषी तज्ञांचे मत आहे.

# माथेरानच्या राणीचा प्रवास ऐतिहासिक ठरणार!

**। नेरळ । वार्ताहर ।**

माथेरान भागावर सध्याच्या डिझेलवर चालणाऱ्या इंजिनला ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचा लूक देऊन या नॅरो गेज रेल्वेच्या गौरवशाली भूतकाळाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी मध्य रेल्वे सज्ज झाली आहे. मध्य रेल्वेच्या परळ कार्यशाळेतील अभियंते आणि तंत्रज्ञांची एक विशेष टीम सदर बदल करण्यासाठी, स्टीम इंजिन हूडचे मॉडेल तयार करण्यासाठी आणि आवश्यक बदल करण्यासाठी काम करत आहेत. यामुळे इंजिन सुरळीत चालण्यासाठी आणि त्याचे ऐतिहासिक सौंदर्य राखण्यासाठी मदत मिळणार आहे.

हेरिटेज लूक देण्याच्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अनेक तांत्रिक प्रक्रियांचा समावेश होता. ज्यामध्ये सध्याच्या इंजिनचे हुड काढून टाकणे, हुड सारख्या नवीन ऐतिहासिक वाफेवर चालणाऱ्या इंजिनचे उत्पादन आणि फिटिंग, सध्याच्या डिझेल इंजिनमध्ये बदल करणे, वाफेचे फिटिंग आणि ध्वनी उत्पादन प्रणाली आणि शेवटी नवीन ऐतिहासिक हुडसह इंजिनचे पेंटिंग आणि आवश्यकतेनुसार स्टिकर्ससह सजावट करणे आदी कामांचा समावेश असल्याची माहिती मध्यरेल्वे प्रशासनाच्या जनसंपर्क विभागाने प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली आहे.



नेरळ- माथेरान रेल्वेचे बांधकाम १९०४ मध्ये सुरू झाले आणि दोन फूट गेज लाईन अखेरीस १९०७ मध्ये वाहतुकीसाठी खुली करण्यात आली. खबरदारीचा उपाय म्हणून पावसाळ्यात हा मार्ग बंद असतो. मात्र अमन लॉज ते माथेरान दरम्यानची शटल सेवा पावसाळ्यातही सुरू असते. मध्य रेल्वेने प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी या विभागात अनेक पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली आहेत. मोबाईल चार्जिंग सुविधा, लॉकर यासारख्या आधुनिक सुविधांनी सुसज्ज, जास्तीत जास्त आराम आणि गोपनीयता देण्यासाठी डिझाईन केलेले, पर्यटकांसाठी स्लीपिंग पॉड्स सादर करण्यासाठी सज्ज आहे. रूम सर्व्हिसेस, फायर अलार्म, इंटरकॉम सिस्टम, डिलक्स टॉयलेट आणि बाथरूम सुविधा, अशा इतर सुविधाही मिळणार आहेत. हा उपक्रम केवळ पर्यटकांसाठी एकंदर अनुभवच वाढवणार नाही तर पर्यटनाला चालना देऊन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन स्थानिक अर्थव्यवस्थेतही महत्त्वपूर्ण योगदान देणारा ठरणार आहे.

# मुरूड शहरात मान्सुनपूर्व कामांना गती

## गटारांची साफसफाई जोरात

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पाऊस काही दिवसांवर येऊन ठेपल्याने मान्सुनपूर्व साफसफाईची कामे हाती घेतले असून शहरातील गटार साफसफाईच्या कामाला गती मिळाली आहे.

मुरूड शहरासह पंचक्रोशीभागात परिसरात ३५०० मिमी पेक्षा जास्त पाऊस पडत असल्याने रस्त्यावर पाणी जमा होऊ नये. त्याकरिता मुरूड जंजिरा नगरपरिषद मार्फत दरवर्षी मान्सुनपूर्व साफसफाईच्या माध्यमातून शहरातील सर्व गटारे व गटारावरील वाढलेली झाडे-झुडपे तोडून साफ केली जातात. शहरात जवळपास ३५ किलोमीटर गटारे व



५ किलोमीटर मुख्य नाले आहेत. पालिकेकडून एप्रिल व मे महिन्यात गटारांची साफसफाई केली जाते. मुरूड शहर स्वच्छ व सुंदर अशी ओळख आहे. त्यामुळे येथे गटारे व नाल्याची विशेष काळजी घेतली जात आहे. वेळोवेळी गटारे साफ करण्यात येत असल्याने येथे गटारे पावसात तुंबणे, दुर्गंधी होणे या सारख्या समस्या नसतात. साफसफाईचा ठेका व्हि.डी.के. पुणा यांना देण्यात आला असून हे काम साधारण ५० टक्के पेक्षा जास्त पूर्ण झाले आहे. ३० मे पर्यंत गटार सफाईची काम पूर्ण होतील अशी माहिती आरोग्य निरीक्षक राकेश पाटील यांनी दिली. नागरिकांनी नाल्यात कचरा टाकू नये, नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन राकेश पाटील यांनी केले.

## महेरीन शेख प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

**श्रीवर्धन :** नुकताच बारावी परिक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. येथील गोखले महाविद्यालयातील वाणिज्य शाखेची विद्यार्थिनी महेरीन हीफजू रहमान शेख हिने ६८ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. एका मध्यम वर्गीय कुटुंबातील मुलीने हे यश संपादन केल्याने मेमन समाजाचे माजी अध्यक्ष जाफर मेमन, आराठी ग्रामपंचायतीचे सदस्य टिनू शेख यांनी महेरीनचे पुष्पगुच्छ देऊन तिचा सत्कार केला व अभिनंदन देखील केले. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल विविध मान्यवरांनी देखील तिचे अभिनंदन केले आहे.

# माथेरानमध्ये अश्वशर्यतींचा थरार

## स्पर्धेसाठी होणार पर्यटकांची गर्दी

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

मे महिन्यातील शेवटच्या विकेंडला माथेरानच्या लालमातीत वीर हुतात्मा भाई क्रीडा संकुलात अश्व शर्यतींचा थरार पहायला मिळणार आहे. त्यामुळे मे महिन्यातील शेवटच्या विकेंडला माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांची तोबा गर्दी होणार आहे.

माथेरान युथ सोशल क्लब व माथेरान नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने येथील वीर हुतात्मा भाई क्रीडा संकुलात अश्वशर्यतींचे



आयोजन अनेक दशकांपासून करण्यात येत आहे. यामध्ये भाला रेस, बॉल अँड बकेट, ट्रॉटिंग रेस, रिले रेस तसेच अन्य शर्यतींचा समावेश आहे.

मे महिन्यातील अखेरच्या हंगामात दाखल होणाऱ्या पर्यटकांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे. त्यामुळे सुट्ट्यांच्या शेवटच्या टप्प्यात माथेरान नगरीत अश्वशर्यतींचा थरार पाहण्यासाठी पर्यटकांची तोबा गर्दी होणार असे बोलले जात आहे. हॉटेल्स, लॉज आरक्षित केले जात आहेत.

पान १ वरुन

## डोंबिवली हादरली

दलातील सात ते आठ बंब तसेच एनडीआरएफ, टीडीआरएफ पथकाला पाचारण करण्यात आले. स्फोटानंतर लागलेल्या आगीची दाहकता प्रचंड असल्याने परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे बचाव यंत्रणेला अवघड झाले. याशिवाय आसपासच्या कंपन्यांपर्यंत ही आग पोहोचल्याने त्या कंपन्यांनाही धोका निर्माण झाला होता. केमिकल कंपनीजवळच ह्युंदाई कारचे शोरुम देखील आगीच्या भक्षस्थानी सापडले. त्यासोबतच परिसरातील अनेकांच्या घरांच्या खिडक्यांच्या काचा फुटून नुकसान झाले आहे.

## सहा जणांचे मृतदेह सापडले

बुडाली होती त्या परिसरात आज सकाळी एका पाठोपाठ एक असे पाच मृतदेह आढळून आले. त्यानंतर सहावा मृतदेह सापडला. सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला असून आज सकाळी तिसऱ्या दिवशीही उजनी जलाशयाच्या दोन्ही काठावर बुडालेल्या व्यक्तींचे नातेवाईक व ग्रामस्थ बसून होते. आज राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांना या व्यक्ती आढळून आल्या मात्र त्या मृतावस्थेत. उजनीकाठ नातेवाईकांच्या आक्रोशाने पुन्हा गहिवरला.

काल दुपारी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या पथकाला जलाशयात बोटीचा ठाव ठिकाणा लागला होता. मात्र पाण्यात बुडालेल्या कोणाचाही शोध लागला नव्हता. बोटीत असलेली एक मोटरसायकल सापडली होती. आज सकाळपासूनच राष्ट्रीय आपत्ती दलाचे वीस जवान तीन बोटीद्वारे शोध घेत होते. काही मच्छीमारांच्या होडीही त्यांच्या मदतीला होत्या. काही स्थानिक बोटीही या मोहिमेत सहभागी झाल्या. छत्तीस तासांच्या अथक परिश्रमानंतर आज बोट दुर्घटनेत सापडलेल्यांचा शोध लागला. मात्र ते मृतावस्थेत आढळून आले. दरम्यान त्यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी करमाळा ग्रामीण रुग्णालयात पाठवले असून त्यानंतर नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात येणार आहेत.

या दुर्घटनेतील गोकुळ दत्तात्रय जाधव (वय ३०), कोमल गोकुळ जाधव ( वय २५), माही गोकुळ जाधव (वय ३), शुभम गोकुळ जाधव (वय अठरा महिने, सर्व रा. झरे ता. करमाळा) अनुराग ज्ञानदेव अवघडे (वय २६), गौरव धनंजय डोंगरे (वय २४ रा. कुगाव ता. करमाळा) यांचा शोध लागला असून सहाही जण मृत्युमुखी पडले आहेत.

## उमटे धरण लवकरच होणार गाळमुक्त

फॉर ट्रान्सफॉर्मिंग इंडिया या आमच्या सामाजिक संस्थेला (सीएफटीआय) सीएसआर फंडातून गाळ काढण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करण्यात आली होती. चित्रलेखा नृपाल पाटील, प्रशांत नाईक आणि उमटे धरण संघर्ष ग्रुप मागणीला यश आले आणि १७ मे पासून गाळ काढण्यास सुरुवात झाली, उमटे धरण संघर्ष ग्रुपने मानले प्रशांत नाईक आणि चित्रलेखा नृपाल पाटील यांचे आभार.

२२ मे रोजी चित्रलेखा नृपाल पाटील यांनी उमटे धरणाची पाहणी केली तशी यापूर्वी सुद्धा चित्रलेखा पाटील यांनी पाहणी केलेली होती तसेच अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी सुद्धा दोन तीन वेळा पाहणी करून पावसाळ्या पूर्वी गाळ जास्तीत जास्त काढण्याचे प्रयत्न असल्याचे पाहणी दरम्यान संगितले. आजवर शेकापक्षाच्या माध्यमातून कायमचं तळागाळातील प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि दिलेला शब्द पूर्ण सुद्धा केला आहे. कोरोना काळात अविरत पणे केलेले काम ही आमच्या कामाची पोच पावती आहे. जसे शिक्षण क्षेत्रात आमचे काम आहे तसेच काम शुद्ध पाणी गावागावांत देण्याचा आमचा संकल्प आहे असे चित्रलेखा नृपाल पाटील यांनी सांगितले. यावेळी उमटे धरण संघर्ष ग्रुपचे पदाधिकारी अ‍ॅड. राकेश पाटील आणि उमटे धरण संघर्ष ग्रुपचे सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात भरपूर पाऊस पडतो मात्र सरकारी यंत्रणे कडे पाणी आडवा पाणी जिरवा, छोटे छोटे डॅम तयार करणे अशी यंत्रणा नाही आहे, डोंगरावरून येणारे पावसाचे पाणी, नैसर्गिक झऱ्यांचे पाणी थेट समुद्रात जाते आणि आपल्या जिल्ह्याला, तालुक्याला एप्रिल, मे महिन्यांत दुष्काळाला सामोरे जावे लागते ही शोकांतिका आहे.

## आई वडिलांचे छत्र नसताना १२ वी परीक्षा उत्तीर्ण

**। पाली । वार्ताहर ।**

प्रबळ इच्छाशक्ती, जिद्द व मेहनतीच्या जोरावर काहीजण यश खेचून आणतात. नुकताच १२ वीच्या परिक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. सुधागड तालुक्यातील आसरे येथील रोशन ज्ञानदेव लांगी हा ३५.६७ टक्के गुण मिळवून १२ वी (विज्ञान) परीक्षा उतीर्ण झाला झाला. आई वडिलांचे छत्र नसताना काम करून जिद्द व मेहनतीच्या जोरावर त्याने हे यश संपादित केले आहे. त्यामुळे त्याच्या या अनोख्या यशाचे



सर्वत्र कौतुक होत आहे.

अवघ्या १० वर्षांचा असताना रोशनचे वडील धरणात बुडून दगावले. त्यांनतर त्याची आई घर सोडून गेली. रोशनसोबत त्याची लहान बहीण व मोठा भाऊ होता. रोशन आपल्या काकाकडे राहू लागला आणि सोबतच काकाचा डीजेचा व्यवसाय सांभाळू लागला. हा व्यवसाय सांभाळतच तो आपला उदरनिर्वाह देखील करत आहे. मोठा भाऊ चौदाविला आहे तर बहीण दहावीत आहे. अगदी लहान वयचीा त्याने आपली भावंड व स्वतःची जबाबदारी खांद्यावर घेतली. १७ नंबरचा फॉर्म भरून बारावी विज्ञानची परीक्षा दिली. घरची जबाबदारी सांभाळत कामधंदा करत मिळेल त्या वेळेमध्ये अभ्यास करून रोशन बारावीची परीक्षा पास झाला. त्याला पुढे आणखी शिकायचे आहे. त्याच्या या जिद्दीला व मेहनतीला सर्वांनी सलाम केला आहे. रोशनने उत्तीर्ण होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचे त्याच्या कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापक, वर्गशिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक करून त्याला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



■ अलिबाग येथील आरसीएफ कुरुळ कॉलनीतील विश्वशांती बुध्द विहार येथे बुध्द पौर्णिमा उत्साहात साजरी झाली. (छायाचित्र : समीर मालोदे)

# नेरळमध्ये वैशाख पौर्णिमेनिमित्त हनुमान जन्मोत्सव

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ गावातील सध्याच्या छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे पूर्वीच्या काळी यात्रा भरायची. वैशाख पौर्णिमा निमित्त मैदानाच्या बाजूला असलेल्या हनुमान मंदिरात हनुमान जन्मोत्सव साजरा होतो. दरम्यान, पूर्वीच्या नासके म्हणून ओळख असलेल्या तलाव परिसरात ही यात्रा भरायची असे या भागातील ज्येष्ठ आवर्जुन सांगतात. त्यामुळे येथील वैशाख पौर्णिमा आणि हनुमान जन्मोत्सवाली मोठा उत्साह असतो.

नेरळ गावातील कुंभार आळी मधील पूर्वी नास्के तळे म्हणून ओळखले जाणाऱ्या ठिकाणी आता छत्रपती शिवाजी महाराज मैदान निर्माण केले गेले. तेथे जवळील मारूतीचा जन्मोत्सव वैशाख पौर्णिमेला मोठ्या जत्रेसह साजरा व्हायचा. संपूर्ण कुंभार आळी परीसर जत्रेच्या खेळण्यांच्या दुकानांनी आणि खाऊच्या दुकानांनी गजबजून जायचा. यामध्ये चणाचटपटी हा खाद्यपदार्थ सगळ्यांचे आकर्षण ठरायचा. उन्हाळ्याचे दिवसात मंदिजवळचे तळे पूर्ण पाणी अटून गेल्याने तिथे कुस्तीचा अखाडा तयार करून त्यावेळी राज्यस्तरीय कुस्तीचे सामने या दिवशी घेतले जायचे. तसेच तळ्याच्या उर्वरित परीसरात लहामुलांसाठी मोठ मोठे पाळणे व विविध खेळही असायचे. कुस्तीच्या सामन्यासाठी आणि उत्सव यशस्वी होण्यासाठी दाजी जोगळे, शिवराम लोभी, जानू गोमारे, शंकर पेढामकर, मारुती कांबळे, दगडू खराटे, पंढरी खांगटे, दत्तूदादा, अनंता कुंभार, दत्तू दहीवलीकर, गजानन पालशीतकर,प्रकाश कवाडकर शंकर गुरव, गजानन डबरे, विजय पांचाळ, देहू कांबरी, मोहीते, विनायक जामघरे, राघो राणे, भिवा राणे,धर्मा राणे, राजन पाटणकर आदी कुटुंबांचा सहभाग असायचा.

श्री मारूतीराया वरील श्रद्धेने दर्शनासाठी तसेच कुस्तीच्या सामन्यासहजत्रेचा आनंद घेण्यासाठी पंचक्रोशी तील लहानथोर सहकुटुंब प्रचंड मोठ्या प्रमाणात जमायचे. हे मंदिर पाटणकर परिवाराचे असून या मंदिराची स्थापना कृष्णाजी गेनू पाटणकर यांनी केली. त्यांना अप्पा काळे यांचे सहकार्य लाभत असे.

वैशाख पौर्णिमा निमित्त मंदिरामध्ये सकाळी अभिषेक आणि जन्मोत्सवासह तसेच सायंकाळी देवाची नगरप्रदक्षिणा (पालखी) काढली जाते. त्यावेळचे प्रख्यात द्वारकानाथबुवा पाटकर, आण्णा गणपतबुवा पांचाळ, वामनबुवा कुंभार, विठूबुवा कुंभार, हरिश्चंद्र बुवा यादव, काळूबुवा मसणे, सुरुकाका सावंत, मधुकर




धामापूरकर, हरिश्चंद्र मगर, अरुण जोशी, शिनारेबुवा, परशुराम जोशी, अरुणदादा धारप इ.व सर्व उपस्थित भावीक भजनात नामघोषात प्रदक्षिणा पूर्ण होवून मंदिरात आरतीने उत्सवाची सांगता होत असे.

आताच्या पिढीतील बल्लाळ जोशी, मोहन पळसकर, नंदा सावंत, माधव पिंपुटकर, प्रमोद भडसावले, शांताराम पळसकर, नाना हजारे, संदीप मोडक, कैलास दहीवलीकर तसेच अक्षय जोशी, अमेय जोशी, अभिषेक कांबळे यांच्याकडून सेवेत खंड पडलेला नाही.

मात्र आजही वैशाख पौर्णिमा निमित्त कर्जत तालुक्यात नेरळ येथे हनुमान जन्मोत्सव साजरा होत आहे. जुन्या आठवणींना त्यानिमित्त अनेक ज्येष्ठ मंडळी उजाळा देत असतात.

## मराठीत ३,३४२ जण नापास

**मुंबई :** राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेत मराठी भाषा विषयात तब्बल ३ हजार ३४२ विद्यार्थी नापास झाले आहेत. तर नोंदणी केलेल्यांपैकी ६७४ विद्यार्थ्यांनी परीक्षाच दिली नसल्याची माहिती निकालानंतर समोर आली आहे. मंडळाकडून बारावीची परीक्षा १५४ विषयांसाठी घेण्यात आली होती. त्यापैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. यात मराठी विषयासाठी राज्यभरातून ९७ हजार ३८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ९६ हजार ७०९ जण परीक्षेला बसले होते. त्यापैकी ९३ हजार ३६७ जण उत्तीर्ण झाले असून मराठी भाषेचा एकूण निकाल ९६.५४ टक्के इतका आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसीने कळवण्यात येते की, आमचे अशिल यांने मौजे-हातनोली, ता.खालापुर, जि.रायगड येथील मिळकत, त्या मिळकतीचे मालक श्री.नितिन त्रिंबकराव देशमुख यांच्याकडून कायम खरेदीखताने घेण्याचे ठरवले असून सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ५८ | १ | १.८३.६० | १८.५३ |

सदर मिळकतीच्या अनुषंगे खरेदी व्यवहाराबाबत आमच्या अशिलाने जमिन मालकांशी बोलणी केलेली आहे, तरी वर नमूद मिळकतीच्या अनुषंगे आमचे अशिल व जमिन मालकांच्यादरम्यान होणाऱ्या खरेदी व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा तक्रार असल्यास, तसेच कोणत्याही वित्तीय बँक, संस्था यांच्याशी तारण बोजा अथवा अन्य कुणाशीही गहाणखत, साठेखत, मृत्युपत्र, अथवा वहिवाटीसंबंधी कोणतीही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसात आवश्यक त्या कायदेशीर कागदपत्रांसहीत खालील नमूद वकीलांच्या पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत अथवा तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचे मानून आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.२४/०५/२०२४

वकील
**अ‍ॅड.सचिन संजय सुर्वे**
पत्ता : नाथ सदन, आमराई रोड,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१
मो नं.९०२८५४६१५७/७३८५५४६१५७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे भोईरवाडी, ता.कर्जत जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक रविंद्र धोंडु लोहट वैगेरे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३८ | १/अ/१ | ०-२३-०० | १-५९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांचे आत खालील सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/०५/२०२४

पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

**अ‍ॅड.समीर आर सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो नं. ९१५८३१३७३३

**निवडक**

## बसची कंटेनरला धडक

**रसायनी :** रिस गावच्या हद्दीमध्ये मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेवर इचलकरंजी-मुंबई सेंट्रल या बसने भाताण बोगद्याजवळ पुढे जात असलेल्या कंटेनर क्र. एमएच ४६ बीएम ७०८७ याला ठोकर मारून अपघात केला. या अपघातात बसमधील १५ प्रवाशांना दुखापती झाल्या. याबाबत पोलीस हवालदार सचिन चोरे यांनी आरोपी बस चालक रोहित राजाराम कांबळे (वय ३२, रा. भादोली, ता. हातकणंगले) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## गुळसुंदेत दुचाकीची चोरी

**रसायनी :** गुळसुंदे अकुलवाडी येथील इसमाची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. ही घटना रसायनी पोलीस ठाणे हद्दीत घडली. फिर्यादींनी कातकरीवाडी येथे त्यांच्या घरासमोर उभी केलेली ३० हजार रुपयांची एम.एच. ४६ बी वाय ३०८२ या क्रमांकाची आरसी २०० ही मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. याबाबत रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह मदन पाटील हे करीत आहेत.

## वाहतूक विभागाची कारवाई

**अलिबाग :** रायगड जिल्हा वाहतूक पोलिसांमार्फत संपूर्ण जिल्ह्यात जागोजागी बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत बुधवारी २८ पोलीस ठाण्यांतर्गत केलेल्या कारवाईत २०३ जणांवर कारवाई करण्यात आली. मद्यप्राशन, ओव्हरलोड, विना परवाना, काळ्या काचा असे विविध वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांकडून पोलिसांनी १ लाख ३० हजार ९०० रुपयांचा दंड पोलिसांनी वसूल केला आहे. ही कारवाई संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यात आली.

## कर्जतमध्ये घरफोडी

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील कोंदिवडे हद्दीत साम्राज्य रिसॉर्ट बंगल्यातून अज्ञात चोरट्याने ५४ हजार रुपयांचा माल लंपास केला. मिळालेल्या माहितीनूसार, कोदिवडे येथील साम्राज्य रिसॉर्टच्या मागील खिडकीचे लॉक तोडून अज्ञात चोरट्यात आत प्रवेश केला. तसेच रिसॉर्टमधून ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. याप्रकरणी कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस हवालदार समीर भोईर अधिक तपास करीत आहेत.

## महिलेला बेदम मारहाण

**खालापूर :** विणेगाव येथील महिला जंगलात लाकडे आणण्यासाठी गेली होती. यावेळी सोबत जाण्यास नकार दिल्याच्या कारणावरुन आंबेवली, रजपेवाडी येथील आरोपीने विणेगाव येथील फिर्यादी महिलेच्या डोक्यात दगड मारुन दुखापत केली. तसेच हाताबुक्क्याने मारहाण केल्याची घटना बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस हवालदार गभाले अधिक तपास करीत आहेत.

# सरी बरसल्या, दर्जा घसरला

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. या पावसाने मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाच्या कामाचा निकृष्ट दर्जा समोर आला आहे. ज्या ठिकाणी रस्त्याचे काम पुर्ण झाले आहे, त्या रस्त्याच्या बाजूच्या साईडपट्ट्यांचे काम निकृष्ट असल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. अवकाळी पडलेल्या पावसात या साईडपट्ट्यांची झालेली धूप पाहता पावसाळ्यात या रस्त्याची काय अवस्था होईल, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावरील रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम जवळपास गेल्या पंधरा वर्षांपासून सुरु आहे. सरकारने अनेकदा आश्वासने दिली, परंतु रस्त्याचे काम पुर्ण होईना. सुरवातीला काही वर्षे खडीमिश्रित डांबर टाकून काम करण्यात आले. यामध्ये शासनाच्या तिजोरीतुन करोडो रुपये वाया गेले. नंतर गेल्या वर्षी सिमेंट काँक्रिटचा रस्ता बनविण्याचा निर्णय घेण्यात आला. काही ठिकाणचा रस्ता पुर्ण झाला आहे. मात्र साईडपट्ट्यांचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून येत आहे.

यावर्षी मुंबई-गोवा महामार्गावरील चौपदरीकरणाचे काम डिसेंबर २०२३ अखेर पुर्ण करण्यात येईल, असे लोकप्रतिनिधींकडून सांगण्यात आले. त्यानंतर डिसेंबर महिना संपताच मे अखेर पूर्ण होईल, असे सांगण्यात आले. केवळ तारीख पे तारीख देण्यात आली. ज्या ठिकाणचे सिमेंट काँक्रिटचे काम पूर्ण झाले आहे. त्या ठिकाणची रस्त्यावर असणारी सिमेंटची धुळ व काही ठिकाणी साईडला टाकलेले मातीचे ढिगारे तसेच असल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी, याकडे शासनाने जाणीवपूर्वक लक्ष देण्याची मागणी करण्यात आली आहे.

### रस्त्यावरील साईडपट्ट्यांची धूप, अपघाताचा धोका वाढला

### शासनाचे कोट्यवधी रुपये गेले पाण्यात



निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे अपघातात वाढ होत असून धुळीमुळे आजारातही वाढ होत आहे. त्यामुळे प्रवासी, रहिवासी नागरिक पूर्णपणे हैराण झाले असुन याला जबाबदार कोण, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

सध्या या मार्गावरील नदीवरील पुलाचे व मोऱ्यांचे कामही अपूर्ण तर काही पुलाच्या बांधकामाला सुरुवातही केली नाही. त्यामुळे यावर्षी मुंबई-गोवा महामार्ग होण्याचे स्वप्नही अधूरेच राहणार असल्याचे मत कोकणवासियांनी व्यक्त केले आहे.

## महामार्गावर कारला अपघात



● (छायाचित्रः दिनेश ठमके)

**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

मुंबई -गोवा महामार्गाचे काम अत्यंत धिम्यागतीने सुरू आहे. अनेक वर्षे उलटुनही महामार्गाचे काम हे पुर्णत्वास गेले नाही. या अपुर्ण कामांमुळे महामार्गावर अपघातांची संख्या ही दिवसेंदिवस वाढतच चालली असतांनाच गुरुवारी (दि.२३) सकाळी ८ वाजता महामार्गावरील साईडपट्ट्यांच्या अपुर्ण कामांमुळे स्विफ्ट कार साईडपट्टीवरुन खाली उतरुन हा अपघात झाला. यामध्ये जीवितहानी झाली नाही.

वाकण बाजुकडुन कोलाडच्या दिशेने जाणारी स्विफ्ट कार क्र. एम.एच. ०३ डी.एक्स ६३४१ ही गाडी गोडसई गावाच्या पुढे आली असता एका रिक्षाला ओव्हरटेक करत असतानाच कार चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्यामुळे गाडी साईडपट्टी सोडुन खाली उतरली. साईडपट्टीवर भराव नसल्यामुळे गाडी खड्ड्यात अडकली. दरम्यान, महामार्गावरुन प्रवास करणाऱ्या अनेक वाहनचालकांनी थांबुन ही कार रस्त्यावर काढण्यास मदत करीत माणुसकीचे दर्शन घडविल्याचे चित्र यावेळी पहावयास मिळाले.

## प्रवाशांच्या अंगाची लाही लाही

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

पनवेल रेल्वे स्थानकातील पंखे बंद असल्याने स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना सध्या प्रचंड उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. मोठे जंक्शन, रेल्वे स्थानक म्हणून ओळख असलेल्या या स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्या थांबत असल्याने प्रवाशांची मोठी गर्दी या स्थानकात असते.

पनवेल रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म क्रमांक पाच, सहा, सातवर असलेले मोठमोठे पंखे फक्त नावापुरतेच आहेत.पंख्यांच्या खाली उभे राहिल्यानंतरही हवा लागत नसल्याने प्रवासी वर्गातून सुसज्ज बैठक व्यवस्था तसेच पंख्यांची डागडुजी करण्याची मागणी केली जात आहे.

मे महिना म्हटला की, प्रचंड उकाडा जाणू लागला आहे. त्यात मे महिन्याची सुट्टी म्हटली, लोकांची गावी तसेच सुट्टीला बाहेर फिरायला जाण्याची मोठी धावपळ पाहायला मिळत आहे.

सध्या मार्गांवरील मेल एक्सप्रेस गाड्या तासंन्तास उशिराने धावत असल्याने प्रवाशांना रेल्वे स्थानकांवर गाड्यांची वाट पहावी लागत आहे. मात्र या दरम्यान प्रवाशांची मोठी गैरसोय होताना दिसत आहे. याशिवाय या ठिकाणी असलेले शौचालयांची साफसफाई नसल्यानेही प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे.

# पनवेलकरांना ‘सर्वोच्च’ दिलासा

**फक्त दोन वर्षांचा मालमत्ता कर भरणे बंधनकारक**

**। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।**

गेले कित्येक दिवस चर्चेत असलेल्या पनवेल मालमत्ता कराच्या प्रश्नाबाबत सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पनवेल महापालिका हद्दीतील मालमत्ताधारकांना दोन वर्षांचा मालमत्ता कर भरावा लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने बुधवारपासून (दि.२२) नव्याने बिलांचे वाटप सुरू केले आहे.

पनवेल महापालिका २०१६ मध्ये अस्तित्वात आली. तेव्हापासून महापालिकेने मालमत्ता कराची आकारणी केली होती. प्रत्यक्षात सिडको कर आकारणी करत होती. त्यामुळे खारघर, कामोठे, कळंबोली आणि नवीन पनवेलमधील लाखो रहिवाशांवर कराचा दुहेरी बोजा होता. परिणामी, रहिवाशांनी विरोध केला. विरोध वाढल्याने हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. खारघर हौसिंग फेडरेशनच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना २०२०-२१ आणि २०२१-२२ या आर्थिक वर्षांच्या मालमत्ता कराची बिले द्यावीत, असे स्पष्ट केले. तसेच पूर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कर आकारू नये, असेही स्पष्ट केले. त्यानुसार आता पनवेल महापालिकेने दोन वर्षांची बिले नव्याने तयार केली असून त्याचे वाटप सुरू करण्यात आले आहे.

पनवेल महापालिका हद्दीत अंदाजे साडेतीन लाख मालमत्ताधारक असून सुमारे १ हजार ६५० कोटींच्या मालमत्ता कराची थकबाकी आहे. या लोकसभा निवडणुकीच्या काळातच खारघर हौसिंग फेडरेशनच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने हा मोठा निकाल दिला.

महापालिकेचा दोन वर्षांचा मालमत्ता कर बिले आल्यानंतर दोन महिन्यांत भरायचा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते. दरम्यान, हा निकाल याचिका दाखल केलेल्या फेडरेशनच्या सदस्यांना आदेश लागू आहे की सर्व मालमत्ताधारकांना याबाबत संभ्रम होता. तो संभ्रमही आता दूर झाला असून सर्व मालमत्ताधारकांना मागील दोन वर्षांचा कर भरायचा आहे.

### महापालिकेची चलाखी

पनवेल महापालिका नवे मालमत्ता कराचे बिल देताना त्यात दोन वर्षांची रक्कम नमूद करणार आहेच शिवाय सोबत थकीत वर्षांच्या कराची रक्कमही दाखवणार आहे. ती थकबाकी भरण्याची बंधन मालमत्ताधारकांवर नाही. मात्र, कुणी थकबाकी भरलीच तर तेवढीच कमाई, असा विचार पनवेल महापालिका प्रशासनाने केला आहे.



## नांदगावमध्ये जिओचा लपंडाव

**। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील नांदगाव पंचक्रोशी येथे जिओ नेटवर्क संथगतीने तसेच वारंवार खंडित होत असल्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. जिओच्या महागड्या प्लॅनवर खर्च केलेले पैसे देखील अनाठायी वाया जात आहेत. नुकताच १२ वीचा निकाल ऑनलाइन जाहीर झाला. मात्र या भागातील विद्यार्थ्यांना निकाल बघण्यासाठी १२ किमी पायपीट करुन पालीला जावे लागले. सुट्टीसाठी गावाला आलेल्या नोकरदारांची ऑनलाईन कामे होत नसल्यामुळे ते देखील हैराण झाले आहेत. याबाबत जिओ नेटवर्क कंपनीने योग्य ती दखल घेण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# वाशीच्या शिवकालीन तलावाला जेएसडब्ल्यूचा आधार

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण वाशी येथे जगदंबा मंदिरासमोर शिवकालीन विस्तीर्ण जलाशय आहे. या तलावांचा गाळ काढणे व संरक्षण भिंत बांधण्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. हे काम जेएसडब्ल्यू सीएसआर फंडातून केले जात आहे. यासाठी ग्रामपंचायत सरपंच संदेश ठाकूर उपसरपंच सुरेखा अनंत पाटील आणि ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घेतला आहे.



सुमारे १३ एकर क्षेत्रावर वाशी ओढांगी या दोन गावांना जोडणारा हा शिवकालीन तलाव सुमारे पाच हजार लोकवस्तीसाठी टंचाई कालखंडात पाण्याचा मुख्य स्रोत म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडीत होता. गेली पंचवीस वर्षे या तलावात गाळ साचून पाणी पातळी कमी झाली होती. या समस्येकडे लक्ष केंद्रित करुन वाशी ग्रामपंचायतीचे सरपंच संदेश ठाकूर आणि ग्रामपंचायत सदस्यांनी या तलावाचा गाळ उपसा काढण्यास प्रारंभ केला आहे.

यासाठी जेएसडब्लू सीएसआर विभागाचे प्रमुख सुधीर तेलंगे आणि टीमचे बहूमुल्य सहकार्य लाभले असून वॉटर संस्थेचे प्रमुख सुशांत वांवढळ आणि प्रशांत पाटील यांच्या सहकार्याने ग्रामसहभाग जल संवर्धन आणि व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत या तलावाचे गाळ काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.

जिथे कमी तिथे आम्ही अशी जेएसडब्लू सीएसआर विभागाची भूमिका आहे. जलसंवर्धन मोहिमेत त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. वाशी शिवकालीन तलावाची पाहणी करुन निधी उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर फंडाचे प्रमुख सुधीर तेलंगे यांनी सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांना आश्वासन दिले आहे. त्यामुळे वाशी ग्राम पंचायत हद्दीतील सर्व जनतेने त्यांचे मनापासून आभार मानले आहेत.

## पेणमध्ये अज्ञात इसमाचा मृतदेह

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यात साई सहारा हॉटेलजवळ अज्ञात इसमाचा मृतदेह आढळून आला. ही घटना बुधवारी (दि.२२) समोर आली. मिळालेल्या माहितीनूसार, एका अज्ञात इसमाने धारदार हत्याराने एका इसमाचा खून करुन आंबिवली फाट्याजवळ बिग बाजारा सारी असे लिहिलेल्या निळ्या रंगाच्या गोणीमध्ये टाकून दिल्याचे समोर आले. ही बाब पोलिसांच्या निदर्शनास येताच त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. याप्रकरणी पेण पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक डी.आर. पोळ अधिक तपास करीत आहेत.

## स्वप्नवत आसमंत हा...



● सुर्यास्तावेळी आकाशात होणारी विविध रंगाची उधळण बघण्यात एक वेगळीच मजा. असेच एक मुरुड समुद्रकिनारी सूर्यास्ताचे नयनरम्य दृश्य मनात कायमचे घर करुन गेले. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## देवपाडा-वारे रस्त्याच्या साईडपट्टीचे निकृष्ट काम

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील नेरळ येथून वंजारपाडाकडे जाणारा रस्ता देवपाडा गावातून वारे गावाजवळ जाऊन मिळतो. कर्जत-मुरबाड राष्ट्रीय महामार्ग येथे जाण्यासाठी हा मार्ग जवळचा बनला असल्याने नागरिकांच्या मागणीनूसार हा रस्ता पूर्ण करण्यात आला आहे. या रस्त्यावर देवपाडापासून वारे मार्गाचे डांबरीकरण करण्यात आले आहे. मात्र या रस्त्याच्या बाजूला मातीची पट्टी टाकण्यात बांधकाम खात्याने नेमून दिलेल्या ठेकेदाराने आखडता हात घेतला आहे. त्यात साईडपट्टी टाकण्यासाठी मुरूम मातीऐवजी साधी माती टाकण्यात आली आहे.

या रस्त्यावर आणखी दोन आदिवासी वाड्या असून वाघेवाडी आणि गुडवण ठाकूरवाडीसाठी देखील आदिवासी लोक या रस्त्याचा वापर करतात. देवपाडापासून वारे या भागातील रस्त्याचे अंतर साधारणतः चार किलोमीटर असून या भागातील आदिवासी लोकांची अनेक वर्षांची मागणी होती. या रस्त्यावर एक वाहन जाईल एवढीच जागा आहे. त्यामुळे दुसरे वाहन रस्त्याने येत असेल तर त्यासाठी जाणे सहज शक्य व्हावे, यासाठी साईडपट्टी टाकणे आवशयक आहे. त्यामुळे याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## औषधी मधाचे दुर्भिक्ष्य

**। पाताळगंगा । काशिनाथ जाधव ।**

पूर्वी घनदाट जंगलांमुळे अनेक प्रकाराची जंगली फुले निर्माण होत असे. यामुळे अशा जंगलात मधमाशी मोठ्या प्रमाणात वास्तव्य करीत असल्यामूळे गावरान मध हे मोठ्या प्रमाणात मिळत असे; मात्र आज विविध प्रदुषणामूळे मधमाशी दुर्मिळ होत असल्याने औषधी मधाचे दुर्भिक्ष्य जाणवत असल्याची वस्तूस्थिती सध्या निर्माण झाली आहे. आज जंगले नामशेष होत चालली असल्यामुळे तसेच सिमेंटच्या जंगलामुळे अनेक वृक्षांची कत्तल होत आसताना जंगलातील वनस्पती नष्ट होत आहे. त्याचबरोबर जंगलात वणवे मोठ्या प्रमाणात लागत असल्याने मधाच्या पोळ्यांबरोबर मधमाशी या वणव्याच्या संकटात अडकल्याने मृत्यू पावत आहेत. यामुळे या माशांनी आपला मोर्चा गावाच्या वस्तीकडे वळविला. मात्र त्यास कृत्रिमरित्या फवारणी करून त्यांचा नाश केला जात आहे. यामुळे सहजिकच मधमाशीची संख्या घटत आहे. सर्दी, खोकला, पोटशुळ आदी आजारांमध्ये मधाचा वापर केला जातो. आयुर्वेदामधील आणि होमिओपॅथीची औषधे बनविण्यासाठी मधाचा वापर केला जातो.

# पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीची यशस्वी वर्षपूर्ती

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळाने २४ मे २०२३ रोजी पदभार स्विकारला होता. येत्या २४ तारखेला विद्यमान संचालक मंडळाच्या कारभाराची वर्षपूर्ती होत आहे. बाजार समितीच्या आवारामध्ये संचालक मंडळाने केलेल्या कार्याचा आढावा घेतला असता या मंडळाचे पहिले वर्ष बऱ्याच अंशी यशस्वी राहिले असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. विद्यमान संचालक मंडळाच्या कार्यप्रणालीमुळे शेतकरी बांधव, व्यापारी, कर्मचारी आणि ग्राहक यांच्यात समाधानाचे वातावरण पाहायला मिळते.




माजी आ. विवेक पाटील यांच्या आशीर्वादाने तर शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील व माजी आ. बाळाराम पाटील यांच्या खमक्या मार्गदर्शनाने तसेच सुप्रसिद्ध उद्योगपती तथा माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे व शेकाप पनवेल विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष काशिनाथ पाटील यांच्या सहकार्याने विद्यमान संचालक मंडळाची बिनविरोध निवड मागच्या वर्षी झाली होती. शेतकरी कामगार पक्षाचे माजी तालुका चिटणीस नारायण घरत हे सभापतीपदी विराजमान झाले तर सुनील सोनावळे यांची उपसभापती नियुक्ती करण्यात आली. तसेच सदस्य म्हणून देवेंद्र गंगाराम मढवी, सुभाष हरिभाऊ पाटील, सखाराम गंगाराम पाटील, महादू गोपाळ पाटील, बाळकृष्ण नारायण पाटील, मच्छिंद्रनाथ गणा पाटील, अर्जुन पांडुरंग गायकर, अशोक गणू गायकर, प्रताप चंद्रकांत हातमोडे, रामचंद्र आत्माराम पाटील, देवेंद्र अनंत पाटील, आतिश दत्ता पाटील, सोमनाथ जनार्दन पाटील, दिनेश ज्ञानेश्वर म्हाडिक आणि सौ ललिता गोपीनाथ फडके असे पंधरा संचालक पहिल्यांदाच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक झाले. म्हणूनच एकूण १७ संचालक असणाऱ्या या मंडळाने सुरुवातीचे दोन महिने एकंदरीत कामकाज व बाजार समितीचे नियम-निकष समजून घेण्यावर भर दिला. त्यानंतर सभापती नारायण घरत यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समितीचे आवारातील संबंधित शेतकरी बांधव, व्यापारी व कर्मचाऱ्यांच्या स्वतंत्र बैठका घेत त्यांचे प्रश्न जाणून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

महाराष्ट्रातील अन्य बाजार समित्यांमधील कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू आहे. परंतु पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू होत असल्यामुळे त्यांना अल्प मोबदल्यावर नोकरी करावी लागते. या गोष्टीची सहानुभूतीपूर्वक दखल घेऊन विद्यमान संचालक मंडळाने कर्मचाऱ्यांना भरीव सानुग्रह अनुदान दिले होते. विद्यमान संचालक मंडळाच्या या निर्णयाने कर्मचारी वर्गात समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

विद्यमान संचालक मंडळाने शेतकरी, व्यापारी, आडते, कर्मचारी यांच्यासोबत उत्तम समन्वय राखल्याने मागील वर्षीच्या तुलनेत बाजार समिती उत्पन्नामध्ये चालू वर्षात भरीव वाढ झाली आहे. संचालक मंडळाने आगामी वर्षांमध्ये मुख्य कार्यालयाच्या शेजारील पॅडी मार्केट इमारतीच्या ठिकाणी सुसज्ज शॉपिंग सेंटर कार्यान्वित करण्याचा मानस ठेवला आहे.संचालक मंडळाच्या वतीने रायगड जिल्हाधिकारी, आयुक्त पनवेल महानगरपालिका आणि सिडको व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे पत्रव्यवहार करून अतिरिक्त ५० एकर जागेची मागणी केली आहे. ही जागा उपलब्ध झाल्यानंतर सर्व सोयीयुक्त निर्यात भवन उभारण्याचा मंडळाचा मानस आहे. तसेच फळांवर प्रक्रिया करणारी मशिनरी, आधुनिक प्रकारच्या सुसज्ज यंत्रणा, अत्याधुनिक सोयी सुविधा आदींनी युक्त हाय टेक बाजार आवार निर्माण करण्याचे ध्येय विद्यमान संचालक मंडळाने समोर ठेवले आहे.

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९६९३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# संघाला बुक्क्यांचा मार

भाजपला आता संघाची गरज नाही असे जेपी नड्डा म्हणाले. इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. नड्डा भाजप या जगातल्या सर्वात मोठ्या पक्षाचे अध्यक्ष आहेत. पण खरं तर ते मोदी आणि शाह यांचे बाहुले आहेत. नड्डांचा कार्यकाळ कधीच संपला आहे. तरीही निवडणुकीचे कारण देऊन त्यांना हंगामी मुदतवाढ देण्यात आली आहे. कारण, मोदी-शाह यांना नड्डांकरवी हव्या त्या रीतीने पक्ष चालवता येतो. म्हणजे, नड्डांनी मोदी-शाह यांचेच मत बोलून दाखवले आहे. त्यांची मुलाखत छापल्याला चार दिवस होऊन गेले. तरीही भाजपमध्ये खळबळ उडालेली नाही. कोणतीही सारवासारव वा खुलासे झालेले नाहीत. याचा अर्थ नड्डांची भूमिका ही अधिकृत आहे असे मानायला हरकत नाही. दुसरीकडे संघाची अवस्था सांगता येईना व सहनही होईना अशी झाली आहे. त्यांना नड्डांबद्द्ल जाहीर निषेध करणे शक्य नाही. कारण, संघाचा राजकारणाशी काही संबंध नाही अशी भूमिका आजवर ते घेत आले आहेत. मोदी सत्तेत आल्यापासून संघाला हव्या त्या गोष्टी घडल्या. राममंदिर झाले. ३७० वे कलम गेले. समान नागरी कायदा आणण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. मात्र इतके सगळे होताना संघाला मिळणारा आदर व सन्मान क्रमाक्रमाने कमी होत गेला. वाजपेयींच्या काळात ते किंवा अन्य मंत्री सरसंघचालकांशी चर्चा करण्यासाठी ते कधीमधी नागपुरात जात. मोदींनी ही पध्दत बंद करून टाकली. सरसंघचालक मोहन भागवत यांच्यासोबत त्यांचे संबंध जितक्यास तितके आहेत. ते त्यांच्याशी कधीही चर्चा करताना दिसत नाहीत. राममंदिराच्या उद्घाटनाच्या समारंभातही भागवतांना केवळ नाइलाजाने स्थान दिले गेले होते. विश्व हिंदू परिषदेच्या लोकांना कटाक्षाने दूर ठेवण्यात आले होते. सर्व फोकस मोदींवर राहील याची काळजी घेतली गेली होती. रामाचे मंदिर खरे तर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे शक्य झाले. पण प्रचार असा करण्यात आला की ते मोदींनी घडवले.

### मोदींचे स्वयंसेवक

कर्नाटक भाजपने तर बालस्वरुपातील रामाला हात धरून मोदी मंदिराकडे नेत आहेत असे पोस्टर प्रसिध्द केले होते. गंमत म्हणजे संघवाले आजवर कधीच लोकशाही मानली नाही. तो नेहमीच एकचालकानुवर्ती पध्दतीचे गोडवे गात आला. सरसंघचालकाने सांगायचे आणि बाकीच्यांनी ऐकायचे हीच योग्य रीत असल्याचे मानत आला. लष्करात जसा सेनापती तसा संघात मुख्य चालक. मोदींनी हीच पध्दत राजकारणात आणली. सर्व काही स्वतःभोवती केंद्रीत केले. सध्या निवडणुकीचा प्रचारही याच रीतीने चालू आहे. सर्वत्र फक्त आणि फक्त मोदींची पोस्टर्स आहेत. त्यावर भाजपची नव्हे तर मोदीची गॅरंटी आहे. मोदी सरकारची गॅरंटी इतकेही म्हणायला ते तयार नाहीत. मोदी स्वतःचा उल्लेख तृतीय वचनात करतात. मोदी ने कहा, मोदी ने किया, जब तक मोदी है असे ते स्वतःविषयी बोलतात. हिंदुस्थानच्या उद्धारासाठी साक्षात परमेश्वराने मोदीला येथे पाठवले आहे असे ते बिनदिक्कत सांगतात. संघवाल्यांच्या कल्पनेत विचारसरणीला मुख्य स्थान होते. भाजपच्या कारभारात मोदी नावाच्या व्यक्तीने ते स्थान हिसकावून घेतले आहे. संघाची पंचाईत अशी आहे की याबद्दल ब्र काढण्याची सोयही मोदींनी ठेवलेली नाही. एक तर कितीतरी वर्षांनंतर संघाकडे निर्विवाद सत्ता आली आहे. तिच्या आधारे सरकारी नोकरशाही, न्यायालये इत्यादींमध्ये घुसखोरी करता येते आहे. शाळा, कॉलेजांचा अभ्यासक्रम बदलता येतो आहे. मिडियाला भ्रष्ट करता येते आहे. संघाला हे सर्व सोडणे शक्य होणारे नाही. त्यातच मोदींनी अनेक स्वयंसेवकांना सत्तेची व पैशाची पदे देऊन भ्रष्ट करून टाकले आहे. हे लोक आता संघाचे नव्हे तर मोदींचे स्वयंसेवक झाले आहेत. संघाला हा तोंड दाबून बुक्क्यांचा मार आहे. त्यातच आता नड्डाबुवांनी संघाला जणू त्याची जणू लायकीच दाखवून दिली आहे. एकेकाळी भाजप संघावर अवलंबून होता, पण आम्ही आता मोठे व सक्षम झाले आहोत असे नड्डा म्हणाले.

### संघ प्रत्युत्तर देईल?

नड्डांच्या बोलण्यात एरवीचा संघाबद्दलचा आदर कोठेही दिसला नाही. उलट म्हातारा-म्हातारीने आता त्यांच्या खोलीत राहावे असे म्हणणाऱ्या उद्धट मुलासारखा त्यांचा आविर्भाव आहे. आम्ही राजकारणात आणि सत्तेत आहोत आणि आमचा कारभार आम्हीच करू शकतो असे त्यांनी सांगितले. म्हटले तर यात काहीच गैर नाही. आहे ही वस्तुस्थितीच आहे. मात्र याचे अनेक अर्थ काढता येऊ शकतात. गेल्या दहा वर्षांमध्ये विस्तार करण्यासाठी भाजपने विरोधकांमध्ये फोडाफोडी केली. आजवर कट्टर विरोधात असलेले काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट इत्यादी सर्वच पक्षांमधील नेते आपल्याकडे खेचून घेतले. यात अनेकांवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. खुद्द भाजपमधील अनेक नेते हे गुंड, मवाली असल्याचे आढळले आहे. तरीही सत्तेच्या हिशेबांमुळे मोदी व शाह त्यांना संरक्षण देतात. हे सर्व संघाच्या तथाकथित सोज्वळ व सुसंस्कृत प्रतिमेत बसणारे नाही. संघ स्वयंसेवकांना हे मानवणारेही नाही. उत्तर भारतात मांसाहाराला पाप मानणारे तसेच गोहत्याबंदीच्या नावाखाली खून पाडणारे लोक स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवतात. हे पुण्याच्या किंवा बंगलोरच्या मध्यमवर्गीय हिंदुत्ववाद्यांना पटणारे नाही. संघामध्ये याबद्दल कमालीची अस्वस्थता आहे. अजित पवारांचा उल्लेख भ्रष्टाचारी असा करून ४८ तासांनंतर त्यांनाच उपमुख्यमंत्री करण्याच्या मोदींच्या राजकारणाचे उदाहरण देशभर दिले जात आहे. संघाला ही आपली बदनामी वाटते. मात्र ती थांबवणे आपल्या हातात राहिलेले नाही असे आता संघातील स्वयंसेवकांना वाटू लागले आहे. यातूनच अनेक ठिकाणी स्वयंसेवक भाजपच्या प्रचारात न उतरल्याच्या बातम्या आहेत. यावर भाजप समन्वयवादी भूमिका घेऊन संघाला चुचकारेल असे संघाच्या नेत्यांना वाटत होते. पण नड्डा यांचा पवित्रा वेगळेच काही सांगतो. सत्ता मोदी-शाह यांच्या डोक्यात इतकी गेली आहे की ते आपल्या बापाला बापही म्हणायला तयार नाहीत असा याचा अर्थ होतो. संघ अर्थातच आपल्या परीने यावर प्रतिघात करील. कदाचित चार जूनला त्याचे प्रत्यंतर पाहायला मिळेल.

विचार

# अफवा आणि संशयाच्या भोवऱ्यात बाजार

***गेल्या आठवड्याभरात लोकसभा निवडणुकीनंतर कोणते सरकार येणार या अस्वस्थेतून शेअर बाजारात अस्थिरता आली आहे. मान्सून वेळेवर येणार असतानाही बाजारात अस्थिरता आहे. सारखी पडझड चालू आहे. एसआयपी आणि गुंतवणुकीचे अन्य मार्ग शोधणाऱ्या नवगुंतवणूकदाराला भ्रमनिरास होणार नाही, असा परतावा आणि स्थैर्य हवे आहे. सट्टेबाजार यात मोठी भूमिका बजावतो. त्याचाही प्रतिसाद काहिसा प्रतिकूल आहे.***



**अजय तिवारी**

लोकसभा निवडणुकीत काय होईल, याची चिंता सर्वसामान्यांना कमी आणि शेअर बाजाराला जास्त, अशी सध्याची स्थिती आहे. लोकसभा निवडणुकीतील चार टप्प्यांचे मतदान पार पडले आहे. लोकसभेच्या ३७९ जागांवरचे मतदान पूर्ण झाले असून १६४ जागांवरचे मतदान राहिले आहे. अशा स्थितीत खरे तर देशाची सत्ता कुणाच्या हाती येईल, याचा पुरेपूर अंदाज यायला हवा होता; परंतु तसे झालेले नाही. दरम्यान, विरोधकांनी सरकारविरोधात आक्रमक होण्याऐवजी सत्ताधारी पक्षच विरोधकांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करत आहे. देशात एकपक्षीय बहुमताचे सरकार असेल तर निर्णयांमध्ये सातत्य असते. आर्थिक सुधारणांच्या दिशेने पावले टाकता येतात. चार वर्षे लोकानुनयाची गरज लागत नाही. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला शिस्त लागते. देशातील तसेच परदेशातील गुंतवणूकदार निवडणुकीनंतर कोणते आणि कसे सरकार येणार, याचा अंदाज बांधून गुंतवणूक करत असतात. या पार्श्वभूमीवर गेल्या काही काळात शेअर बाजारात आलेली अस्थिरता लोकसभा निवडणुकीनंतर कोणते सरकार येणार या अस्वस्थेतूनच पहायला मिळाली. प्रतिकूल जागतिक घटना नाहीत, मॉन्सून वेळेवर आणि चांगला होणार आहे. असे असताना भारतात शेअर बाजारात जास्त अस्थिरता आहे. इतर बचतीचे प्रमाण कमी होत असताना आता एसआयपी आणि गुंतवणुकीचे अन्य मार्ग शोधणाऱ्या नवगुंतवणूकदारांना भ्रमनिरास होणार नाही, असा परतावा आणि स्थैर्य हवे आहे. त्याची ही अपेक्षाही पुन्हा कोणते सरकार येणार यावर अवलंबून आहे. विश्लेषकांपेक्षा निवडणुकीतील सट्टे बाजार यात मोठी भूमिका बजावत असतो. त्यातील वेगवेगळ्या ठिकाणचे अंदाज भ्रम निर्माण करत आहेत. त्याचाही बाजारावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सट्टा बाजार चांगलाच तापला आहे. अफवांच्या महापुरामुळे तज्ज्ञदेखील चिंताग्रस्त आहेत. अलिकडेच बेंचमार्क सेन्सेक्स एक हजारहून अधिक अंकांनी घसरला आणि शेअर बाजाराचा भीती निर्देशांक एप्रिलनंतर वाढला आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी याच सुमारास गुंतवणूकदारांना आश्वस्त करताना म्हटले की चार जूननंतर बाजारात तेजी येईल. डेटावर अवलंबून असलेले नागरिक, कॉर्पोरेट दिग्गज आणि गुंतवणूक बँकर्स स्पीड-डायलिंग आणि गुगलिंग करत असून अफवा आणि प्रतिकूल टिप्पण्यांवर बारीक नजर ठेवत आहेत. लोकसभेच्या जागांच्या बहुविध आकडेमोडीमुळे बाजार चिंतेत आहे. निरिक्षकांनी प्रामुख्याने कर्नाटक, महाराष्ट्र आणि बिहारवर लक्ष केंद्रित केले आहे. तिथे भाजपने गेल्या वेळी ११६ पैकी ६५ जागा जिंकल्या होत्या. भाजप याची पुनरावृत्ती करू शकेल का? या राज्यांमध्ये नुकसान झाले तर भाजप आंध्र प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये भरून काढणार का? बिहारमधील जागांवर नितीश यांचा प्रभाव पडणार असल्याची चर्चा कॉर्पोरेट जगतात आहे. अर्थात मागच्या वेळीही विरोधकांना तिथे एकच जागा मिळाली होती. महाराष्ट्रात होणाऱ्या भाजपच्या नुकसानीचे मूल्यांकन केले जात आहे. गुजरातमधील संभाव्य नुकसान, राजस्थानमधील चार-पाच जागांवरील अनिश्चितता आणि दिल्लीतील केजरीवाल यांचा प्रभाव याबद्दलही त्यांना जाणून घ्यायचे आहे. कर्नाटकमध्ये काँग्रेसच्या हमी मोदींच्या हमीपेक्षा जास्त प्रभावी ठरतात का, असा प्रश्न त्यांना पडला आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये एका ज्येष्ठ इन्व्हेस्टमेंट बँकरने प्रश्न उपस्थित केला होता की भाजप पुन्हा सत्तेत न येण्याचा धोका आहे का? हे अवघड कोडे पाटण्यात विरोधी आघाडी स्थापन झाल्यानंतर उलगडले. दहा वर्षांच्या शासनाविरुद्ध नेहमीच सत्ताविरोधी कल असतो; परंतु भाजपने त्याची धार कमी केली आहे. या पक्षाने सर्व शंका दूर करत राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडच्या विधानसभा निवडणुका जिंकल्या. फेब्रुवारी २०२४ मध्ये भाजपने 'चारसो पार'ची घोषणा केली. त्यामागे अयोध्येतील राम मंदिरात रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा आणि आणि समान नागरी संहितेच्या आश्वासनाने भाजपच्या मूळ मतदारांना सक्रिय केले होते. मात्र निवडणुकीनंतरच्या पहिल्या चार टप्प्यांमधील चित्रानंतर भाजपचा विजयाचा वारू पूर्वीइतक्या वेगाने धावणार नसल्याचा अंदाज आता यायला लागला आहे. एप्रिलच्या पहिल्या दोन आठवड्यापर्यंत शेअर बाजाराचे निर्देशांक नवीन उच्चांकावर गेले; परंतु मे महिन्याच्या सुरुवातीलाच भाजपच्या जागा कमी होण्याचा अंदाज व्यक्त होऊ लागला आणि बाजार अस्थिरतेच्या हिंदोळ्यावर झुलायला लागला.

भाजपच्या प्रचाराच्या रणनीतीत झालेल्या बदलाबाबत पंटर आणि सर्वसामान्यांमध्ये आश्चर्य व्यक्त होत आहे. पहिल्या टप्प्यात कमी मतदानाचा अंदाज घेऊन, भाजपने ध्रुवीकरणाच्या राजकारणावर मोठ्या प्रमाणात जोर दिला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी तुरुंगातून अंतरिम जामीनावर सुटल्यानंतर मोदी यांच्या वयाचा आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांचा प्रश्न उपस्थित केला. भाजपने यापूर्वी आंनदीबेन पटेल, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सुमित्रा महाजन यांना सक्रिय राजकारणातून सक्तीने दूर केले. यापैकी काहींची वर्णी मार्गदर्शक मंडळात लावण्यात आली. बी. एस. येडियुरप्पा यांच्यासाठी वयाचा मुद्दा बाजूला ठेवण्यात आला; परंतु त्यांनाही नंतर पदावरून जावे लागले.

या पार्श्वभूमीवर आता मोदी यांचा अपवाद करण्याची भाषा केली जात असेल, तर भाजपमध्ये एकवाक्यता नाही आणि नियम काही लोकांपुरतेच असतात, असा संदेश जायला लागला आहे. त्याचाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम बाजारावर होतो. संघ परिवारातील मतभेदांचे मुद्देही वारंवार उपस्थित केले जात आहेत. मोदी सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख आकांक्षा पूर्ण केल्या, ही धारणाही वादग्रस्त आहे. सट्टेबाज, पोलस्टर आणि राजकीय पंडितांमधील वादविवाद म्हणजे कथन आणि रणनीतीतील बदल भाजपच्या मूळ मतदारांना बळकट करेल किंवा भाजपपासून दुरावलेल्या मतदारांना बळ देईल. हे लोकांचे प्रश्न मतदानाच्या हेतूबद्दल कमी आणि बाजाराच्या परिस्थितीबद्दल अधिक आहेत.

या पार्श्वभूमीवर अद्याप कोणीही मोठ्या उलथापालथीचा अंदाज लावलेला नाही. लोकसभा निवडणुकीचा निकाल २०१४ च्या जागांच्या जवळपास असेल, असा अंदाज आहे; मात्र धारदार हल्ल्यांमुळे भाजप कमकुवत झाल्याचा समज समर्थक आणि विरोधकांमध्ये निर्माण होत आहे, हे नाकारता येणार नाही. पक्षीय राजकारण आणि पक्षाच्या भवितव्याबाबत होत असलेल्या कथनामुळे निवडणूक प्रचाराच्या गुणवत्तेबाबत चिंता निर्माण झाली आहे. भारत ही सर्वात मोठी लोकशाही आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीमध्ये ९६ कोटींहून अधिक मतदार त्यांच्या पसंतीचे सरकार निवडण्यास पात्र आहेत. यापैकी १.८ कोटी लोक प्रथमच मतदान करत आहेत. चौथ्या टप्प्यातील लोकसभेच्या ९६ जागांसाठी मतदान पार पडले. यापूर्वी २८५ मतदारसंघात मतदान झाले आहे. सैद्धांतिकदृष्ट्या निवडणूक प्रचार म्हणजे स्पर्धात्मक अडचणी आणि विरोधाभासी संकटांची कोंडी सोडवणे. त्याऐवजी सर्वच पक्ष प्रचारादरम्यान दावे-प्रतिदावे आणि खुलासे करत आहेत. घोषणांच्या गोंगाटामुळे मतदारांचा उत्साह कमी झाला आहे.

नोबेल पारितोषिक विजेते हर्बर्ट सायमन एकदा म्हणाले होते की जास्त माहिती 'फोकस'ची कमतरता निर्माण करते. त्यांनी मांडलेला हा सिद्धांत अपूर्ण माहितीचा परिणाम सार्वजनिक धोरणनिर्मितीतून निर्माण झाला आहे. हा नियम निवडणूक प्रचारालाही लागू होतो. या वेळी निवडणुकीच्या प्रचाराचा दर्जा आणि वादाचे स्वरूप यामुळे मतदारांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. देशात लोकसभा निवडणुकीच्या चार टप्प्यांसाठी मतदान झाले आहे. उर्वरित तीन टप्प्यांसाठी एक जूनपर्यंत मतदान होणार आहे. त्यानंतर चार जूनला लोकसभा निवडणुकीचा निकाल लागणार आहे; मात्र या निकालांआधीच विजय-पराजयाचे मूल्यमापन केले जात आहे.

राजस्थानमधील फलोदी येथे सर्वात मनोरंजक मूल्यांकन होत आहे. पाचशे वर्षे जुना फलोदी सट्टेबाजीचा बाजार जगभरात प्रसिद्ध आहे. फलोदी सट्टा बाजारातील विजय-पराजयाचे अंदाज सर्वात अचूक असल्याचे सांगितले जाते. तथापि, हा केवळ अंदाज आहे. तिसऱ्या टप्प्यातील मतदानानंतर फलोदी सट्टेबाजीच्या बाजाराचे ताजे आकलन भाजपची चिंता वाढवू शकते. त्याचाच परिणाम शेअर बाजारावर होत आहे.

आजकाल

# राजीव गांधींचा प्रभाव

**सुनील गजाकोश**

१९८४ ला इंदिरा गांधीचा खून झाला तेव्हा मी १०वीत होतो, १९८५ ला मी दहावी पास झालो आणि उन्हाळ्याच्या सुट्टीत धारावीतल्या श्रमिक विद्यापीठात वायरमॅनचा कोर्स करून पास झालो, ते करता करता त्याच मैदानावर कराटे क्लासेस चालायचे त्यात ही भाग घेतला आणि आयुष्याला कलाटणी लागली.

तिथेच एक श्रमिक युथ ग्रुप म्हणून सामाजीक बांधीलकी मानून काम करणारा एक गट होता, तेथील प्रोग्राम ऑफीसर भिम रास्करांनी तो तरूणांमधे सामाजीक बांधीलकी निर्माण व्हावी व त्यांना काहीतरी दिशा मिळावी म्हणून सूरू केला होता. १९८४ ला भोपळ दुर्घटना झाली होती आणि १९८५ मधे त्यावर अनेक चळवळीतले लोक आवाज उठवत होतो, तिथे महान पथनाट्यकार क्रांती बांदकरांशी ओळख झाली त्यांनी मला त्यांच्या भोपळ गॅस दुर्घटनेवरच्या भस्मासूर नावाच्या पथनाट्याच मुख्य भूमीका देवू केली आणि ती मी निभावली आणि त्यांचे प्रयोग पहिल्यांदा वडाळ्यातील एकादशी मुळे जमणाऱ्या जत्रेत लोकविज्ञान संस्थेच्या स्टॉल मधे झाली, तेथूनच माझी चळवळीशी ओळख झाली आणि पुढील अनेक वर्षे मी शिक्षण सोडून पथनाट्य, वाचन, प्रवास आणि अनेक महान लोकांनी ऐकणं आणि त्याच लोाकांनी सांगीतलेली पुस्तके वाचणे सुरू झाले.

याच काळात राजीव गांधी देशाचे पंतप्रधान होते, चळवळीतील लोक त्यांच्यावर प्रखर टिका करायचे, मला ज्यांची भाषणे आवडायची, जी विचारसरणी जवळची वाटायची ते राजीव गांधीला दुषणे द्यायची, चळवळीचा फायदा माझे ज्ञान व व्यक्तीमत्व विकासाठी झाला आणि राजीव गांधी व त्यावेळेची माध्यम सतत भविष्याबाबत लिहीत बोलत असायची, मी दररोज सगळी वृत्तपत्रे वाचायचो, ते काही तरी नवीन करीत आहेत याची जाणीव व्हायची.

शाळा सुटली होती, घरच्यांनी वाया गेला म्हणून सोडून दिलं होतं, पैसे नसायचे, दादरला चालत जायचो, तरी अनेक कार्यक्रमात सहभाग असायचा, कराटेला ही नियमीत जायचो, अनेक संघटनेच्या मोर्चांमधे मी जायचो. पण वृत्तपत्रे वाचत असतांना राजीव गांधीचे भविष्याबाबत, संगणकाबाबतच्या सगळ्या गोष्टी पटायच्या. आमचा श्रमिक युथ ग्रुप दररोज श्रमिक विद्यापीठाच्या पायरीवर भेटायचा, त्यामुळे आमचा श्रमिक विद्यापीठाच्या स्टाफ बरोबर खुपच चांगला संबंध होता, एका मिनल पटनी नावाच्या तरूण प्रोग्राम ऑफीसर मुलीने मला सांगीतले की आपल्या विद्यापीठात प्रथमच कंम्पूटर प्रोग्रीमींगचा कोर्स सुरू होत आहे, तुझ्या बरोबरच्या गप्पांमधे मला वाटतं की तू लॉजिक विचार करणारा आहेस, तू तो क्लास जॉईन कर फी रू ४०० आहे, त्याचं नंतर बघू पण तू तो क्लास करच असा आग्रह धरला.

मी तीला नाकार देवू शकलो नाही, कराटेच्या क्लासमधे एक लॉटरी घेतली होती ती मला लागली होती त्यात मिळालेले रू ८०० मी बाबांना दिले होते, त्यांनी मला फी साठी ते पैसे दिले आणि कंम्पूटर प्रोग्रीमींगचा क्लास सुरू झाला आणि मला खरचं मजा येवू लागली इतकी की मी सतत प्रश्न विचारत राहीलो, आमचे सर अरुण मणेरीकर होतो, त्यांनी माझी मजल बघुन माझ्यावर खास श्रम घेतले ते मला सुट्टीच्या दिवशी त्यांच्या घरी टिळक नगरला घेवून जायचे, मला सतत शिकवायचे, ते म्हणायचे की तु चांगलाच पुढे जाशील यात. एका वर्षानंतर मी त्या क्लासमधे पहीला आलो होतो. आता हे सगळं चालू असतांना मी कंम्पूटर प्रोग्रीमींगचा डिप्लोमा घेवून असतांनाही १९९० पर्यंत चळवळ, नाटक आणि साक्षरता कार्यक्रामात कार्यकर्ता म्हणून काम करीत होत, कसलंच उत्पन्न नाही. असाच करित असतांना स्त्रीमुक्तीच्या ज्योती म्हपसेकरांनी माझी विचारपूस केली आणि मी कंम्पूटर प्रोग्रीमींगचा कोर्स करूनही काम करीत नाही हे समजल्यावर त्यांनी मला त्यांच्या एका नातेवाईकाकडे पाठवले, तिथे माझ्याकडे फक्त सर्टिफीकेट आहे अनुभव नाही म्हणून त्यांना मला बाद केले, पण माझ्या चेहऱ्यावरचे नाराजीचे भाव बघून तीथे हर्षल पाटील नावाचा एका चांगल्या व्यक्ती मला ट्रेनी म्हणून तू ये काहीही पैसे मिळणार नाहीत पण अनुभव मिळेल तीन महीने तू इथे येवू शकतो अशी सोय केली... मग काय अशा रितीने मला पहीला ब्रेक मिळला... प्रगतीचा मार्ग मिळाला... पुढंच नंतर... वरिल काहणी सागण्याचे कारण की... १९८५ ला मी वायरमॅनचा कोर्स करून काहीही करू शकलो नव्हतो, त्या चळवळीने नवीन दृष्टीकोण दिला आणि तिथे मला कंम्पूटर शिकायला मिळालं... जर राजीव गांधी आणि त्यांचे भविष्याचे आकलन आणि त्यांची धोरणे नसती तर धारावी सारख्या ठिकाणी कंम्पूटर प्रोग्रीमींगचा कार्सच आला नसता. तेव्हा चळवळीतील अनेक जाणते लोक कंम्पूटरायझेशच्या विरूद्ध होते कारण लोकांच्या नोकऱ्या जाणार म्हणून ते मोर्चा काढत होते, मी त्याच लाकांच्या गटात होतो. पण कधी अशी मोर्चांना गेलो नाही, आणि कंम्पूटर हा शब्द आणि त्यामुळे होणारी भविष्यतली प्रगती याबाबत वाचत होतो... योग्य वेळी योग्य काळात असण्याचा फायदा हा की मी १९८९ ला कंम्पूटर शिक्षीत झालो १९९१ ला ट्रेनी म्हणून लागलो त्याच वर्षी राजीव गांधीचा खुन झाला, देशात उथलपुथल झाली भविष्याची खात्री नव्हती, आणि १९९२ ला मनमोहन सिंगचे खुले आर्थिक धोरण आले, आणि माझ्या करियाला मोठा पुश मिळाला... मी जेव्हा जेव्हा माझ्या कुटुंबाचे - समिक्षा करायचो तेव्हा आम्ही इतरांपेक्षा दोन पिढ्या मागे आहोत याची जाणिव व्हायची, वरून माझे आई-वडील दोन्ही अशिक्षीत होते. त्यात मी शिक्षण सोडून बसलेला, बिन पागरी कार्यकर्ता असेलेला तरूण फक्त एक छोटासा कंम्पूटर प्रोग्रीमींगचा कोर्स करून आणि त्यावेळेच्या कंम्पूटर शिक्षितांच्या मागणी मुळे माझे करीयरच नाही तर माझं धारावीत राहणाऱ्या कुटुंबाला दोन पिढ्यांनी पुढे गेल्याची जाणीव होते. म्हणून आजच्या पिढीला सांगणे की राजीव गांधीचे भविष्याबाबतची धोरणेच भारतल्या माझ्या सारख्या अनेक गरीब घरातल्या लोकांना मुख्यधारेत आणले आहे, भारताची १०% पर्यंत घावून जाण्याचा पाया राजीव गांधीच्या , च्या धोरणात होती, अनेक भारतीय आज जागतील अनेक मोठ्या सॉफ्टवेयर कंपनीचे मुख्य आहेत त्यांच श्रेय त्या धोरणांना व त्यानंतर मिळालेल्या डॉ मनमोहन सिंग सारख्या अर्थशास्त्रीला जाते. २०१४ पासून भारत अगदी उलटा चालला आहे मी १९८५ नंतर वृत्तपत्रे भविष्याचा वेध आणि पुढे बदलणाऱ्या जगाची माहीती छापत होती म्हणून मी काहीतरी करू शकलो, आज मिडीया अनेक पटीने वाढला आहे पण त्या भविष्याबाबत काहीच येत नाही, आपण इतिहसात कसे श्रेष्ठ होतो याच्या भ्रामक कथा येतात, आपला नेता किती महान आहे याच्या कथा येतात, बातम्यांमधे आपण इतिहासच्या जोरावर विश्वगुरू बनणार असा दावा होतो, पण प्रत्यक्षात आपण खड्ड्यात जात आहोत.. त्याबाबत येत नाही.. पण १९८५-९१ पर्यंत राजीव गांधीच्या प्रभावामुळे देश खऱ्याखुऱ्या भविष्याकडे नुसता बघत नव्हता तर धोरणे बनवत होता, वाटचाल करीत होता, तरूण नवनवीन तंत्रज्ञान शिकत होतो आणि माध्यमे आमच्या सारख्यांना खरी स्वप्ने पुर्ण होण्याचा मार्ग दाखवत होती... आणि आम्ही आमची स्वप्ने पुर्णही करू शकलो... राजीव गांधीचा तो प्रभाव होता... आज त्याची खुपच गरज आहे.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२४ मे**

**१८३५:-** इंग्रजी कायदा ग्रंथाचे भाषांतरकार बापू पुरुषोत्तम जोशी यांचा जन्म. त्यांनी 'क्रिमिनल प्रोसिजर कोड', 'पिनलकोड', 'लिव्हिल प्रोसिजर कोड' या ग्रंथांची मराठीत भाषांतर केली. **१८६७:-** प्राचीन काव्याभ्यासक, निबंधकार, पत्रकार, संपादक, वक्ता, नट, समाजसुधारक आणि महाराष्ट्र नाटक मंडळींच्या संस्थापक सदस्यांपैकी एक असणारे गोविंद गोपाळ टिपणीस यांचा जन्म. लहान वयातच वाचन, लेखनाची आवड असणाऱ्या टिपणीसांनी फर्ग्यूसन कॉलेजात असताना सुधारक म्हणून 'लग्न' या विषयावर लेखमाला लिहिली होती. मनोरंजन मासिकातून 'संतांचा परिचयफ अशी लेखमाला लिहिली. त्यांचे तुकाराम-वेंचे', 'एकनाथ-वेंचे', 'ज्ञानेश्वर-वेंचे' या खेरीज 'बेंजामिन फ्रॅंकलिनचे चरित्र', 'कौटिल्य अर्थशास्त्रप्रदीप हा ग्रंथ', 'सॉक्रेटिस आणि त्याचे विचार' हे पुस्तक अशी अनेक साहित्य रचना त्यांच्या नावावर आहे. त्यांचे 'हिंदुस्थानातील दुष्काळ', 'सरकार आणि कुलाबा जिल्ह्यातील खोत' ही पुस्तके त्यांच्या राजकीय-सामाजिक- आर्थिक विषयातील अभ्यासाची साक्ष देतात. **१८९३:-** कवी एकनाथ अण्णाजी करकंबकर यांचा जन्म. 'शिवाजी महाराज यांस दादोजी कोंडदेव कृत उपदेश' आणि 'थोरले मल्हारराव होळकर सुभेदार' ह्या त्यांच्या दोन काव्यांना दक्षिणा प्राईस कमिटीकडून पारितोषिके. **१८९५:-** इतिहासकार भास्कर रामचंद्र भालेराव यांचा जन्म. त्यांनी 'मराठ्यांचे श्रेष्ठव', 'मराठ्यांचा देशाभिमान अर्थात मराठेशाही बुडाल्याची मीमांसा' या ग्रंथाशिवाय महादजी शिंदे यांच्या कवितांचे संशोधन करुन त्या प्रकाशित केल्या. **१९२५:-** लेखिका शांता दत्तात्रय गणोरकर यांचा जन्म. ह्यांनी 'बालमेवा', 'स्त्री जीवन दर्शन', 'साक्षरता ज्ञानदीप', 'भुलाबाईची गाणी' अशी ग्रंथ संपदा. **१९२६:-** कादंबरीकार, नाटककार सरदार चिंतामण नारायण मुजुमदार यांचे निधन. 'शेवटचा शूर वाघेर', 'लाख्या बार-गीर', 'गुजराथचा समशेर बहाद्दर', 'राणा हमीर' अशा ओजस्वी, प्रेरक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. 'चमत्कार-अथवा भ्रमनिरास' हे नाटकही त्यांनी लिहिले होते. **१९२७:-** संत चरित्राचे लेखक सदाशिव कृष्ण जोशी यांचा जन्म. ह्यांच्या संतचरित्रात 'ऐसे हे संत श्रीमंत', 'जय जय रघु-वीर समर्थ', 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा', 'तुका झाल-ासे कळस', 'पुत्र अमृताचा', 'प्रेरणा भाग १,२,३' मिळून पंचवीस एक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२८:-** लो. टिळकांचे चिरंजीव, लेखक व कवी श्रीधर बळवंत टिळक यांचे (आत्महत्या) निधन. लो. टिळकांची 'आधी राजकारण व नंतर समाजकारण' ही विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. यावर आधारित काही लेखांचा तसेच त्यांच्या काव्यांचा संग्रह 'माझा व्यासंग' या नावाने प्रसिध्द. २००४:- मराठीत तवशुद्ध नवसमीक्षेची बीजे रोवणारे समीक्षक, सौंदर्यमीमांसा' आणि विचारवंत राजाराम भालचंद्र पाटणकर यांचे निधन. 'सौंदर्यमीमांसा' हा त्यांचा ग्रंथ (१९७४) सर्वाधिक गाजला. त्याला साहित्य अकादमी पुरस्कारही मिळाला, परंतु त्यांचे पहिले पुस्तक म्हणजे १९६९ साली प्रकाशित झालेले 'एस्थेटिक्स अँड लिटररी क्रिटिसिझम'. पुढे 'कांटची सौंदर्यमीमांसा', 'क्रोचेचे सौंदर्यशास्त्र : एक भाष्य' हे सैध्दांतिक चर्चेचे ग्रंथ, तसेच 'कमल देसाई यांचे कथाविश्व', 'मुक्तिबोधांचे साहित्य', 'कथाकार शांताराम' या त्यांच्या समकालीन लेखकांवरील टीकाग्रंथ त्यांनी लिहिले. कलाकृतीची निर्मिती आणि आस्वाद यांनी मिळून बनणारा कलाव्यवहार हा अन्य व्यवहारापासून स्वाया असतो, हा पाश्चात्य दृष्टिकोन मराठीत समर्थपणे मांडणाऱ्या 'रा. भां' नी 'एरिअल' या टोपण नावाने कथा व कविताही लिहिल्या होत्या. **२००९:-** इतिहासाचे नामवंत अभ्यासक, पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे संस्थापक प्रमुख, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरु आणि भारतीय इतिहास संशोधक परिषदेचे अध्यक्ष डॉ. अ.रा. उर्फ अनंत रामचंद्र कुलकर्णी यांचे निधन. 'मराठ्यांचा इतिहास' हा त्यांच्या अभ्यासाचा आणि आवडीचा विषय. 'महाराष्ट्र इन दि एज ऑफ शिवाजी' या ग्रंथासह शिवकालीन महाराष्ट्र व मराठ्यांच्या इतिहासावरील अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले. मराठ्यांच्या इतिहासाच्या आर्थिक, सामाजिक पैलूंवर त्यांनी केलेले भाष्य इतिहास संशोधनातील एक महवाचा टप्पा दर्शविते. महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास अखिल भारतीय स्तरावर पोहोचविण्याचे काम त्यांनी केले आहे. लंडनमधील संशोधनाच्या आधारेच त्यांनी ग्रँड डफ याच्यावरील ग्रंथाचे लेखन केले. 'मराठवाड्याचे इतिहासकार', 'मध्ययुगीन महाराष्ट्र', 'मराठे आणि महाराष्ट्र', 'जेधे शकावली करीना', 'महाराष्ट्र सोसायटी अँड कल्चर', 'मराठाज् मिडिव्हल महाराष्ट्र', 'स्टडीज इन मराठा हिस्ट्री' अशा अनेक ग्रंथांचे लेखन डॉ.कुलकर्णी यांनी केले आहे. ग. ह. खरे यांच्या समवेत 'मराठ्यांचा इतिहास खंड १, खंड २, आणि खंड ३' या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले आहे. **२०१४:-** 'लोपामुद्रा' दिवाळी अंकाच्या संस्थापक-संपादिका आणि ज्येष्ठ पत्रकार वसुधा वसंत पंडीत यांचे निधन. **२०१६:-** ज्येष्ठ पत्रकार वि.ना. देवधर यांचे निधन. त्यांनी 'लोकसत्तेत' सहसंपादक तर 'तरुण भारत' चे संपादक म्हणून कामकाज केले. बातमीदारी करताना डोळे, कान आणि मन देखील उघडे ठेवायचे त्यात कुठे 'मी' पणा येऊ द्यायचा नाही हा त्यांचा कटाक्ष होता.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे



२४ मे
१) श्री. (डॉ.) अशोक रामचंद्र माने
अलिबाग २४-०५-१९५०
२) श्री. विजय देवराम गाजरे
मारूतीनाका, अलिबाग २४-०५-१९५६
३)श्री.शैलेश रामकृष्ण म्हात्रे
मु.सातिर्जे, अलिबाग २४-०५-१९५६

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयातदाखल असलेल्यारुग्णांच्याएकानातेवाईकालाजेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

**हर्ष मुकेश जैन**
**वाढदिवस अलिबाग**

# अंगणवाड्यांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**उच्च शिक्षणामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली असताना आता येत्या शैक्षणिक वर्षात पूर्वप्राथमिक स्तरावरही धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यात येणार आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार तयार केलेल्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके राज्यातील १ लाख ३१ हजार अंगणवाड्यांना पुरवली जाणार आहेत. यामुळे रायगड जिल्ह्यातील अंगणवाड्यांमधील बालकांना नव्या अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करावा लागणार आहे.**




आतापर्यंत पूर्वप्राथमिक शिक्षणाचा समावेश औपचारिक शिक्षणामध्ये करण्यात आला नव्हता. त्यामुळे अक्षरांची तोंडओळख, गाणी, गोष्टी, खेळ अशा स्वरूपात शैक्षणिक प्रक्रिया चालत होती. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात शैक्षणिक चौकटच बदलण्यात आली आहे. त्यामुळे पूर्वप्राथमिक शिक्षणाचा औपचारिक शिक्षणात समावेश झाला आहे. पूर्वप्राथमिक शिक्षणात पायाभूत साक्षरता आणि अंकज्ञान महत्त्वाचे मानण्यात आले आहे. या अनुषंगाने धोरणात प्रस्तावित केल्यानुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने पूर्वप्राथमिक किंवा पायाभूत स्तरासाठीचा अभ्यासक्रम आराखडा तयार केला.

या आराखड्यानुसार राज्य स्तरासाठीच्या अभ्यासक्रमाची राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने निर्मिती केली आहे. तर बालभारतीकडून पाठ्यपुस्तकांची निर्मिती, छपाई करून अंगणवाड्यांना पुस्तके वितरित केली जाणार आहेत. त्यामुळे उच्च शिक्षणातील होत असलेल्या बदलांपाठोपाठ आता पूर्वप्राथमिक स्तरापासूनचे बदल सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

येत्या शैक्षणिक वर्षापासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची राज्यातील पूर्वप्राथमिक स्तरावर अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्याची सुरुवात शासकीय अंगणवाड्यांपासून केली जाणार आहे. त्यात अंगणवाड्यांना अभ्यासक्रमाची पाठ्यपुस्तके पुरवली जाणार आहेत. पहिल्यांदाच पूर्वप्राथमिक स्तरावर औपचारिक अभ्यासक्रम राबवला जाणार आहे, अशी माहिती राज्याचे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली.

पूर्वप्राथमिक स्तरासाठीची पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आहे. त्यानंतर पाठ्यपुस्तकांची छपाई करून ती अंगणवाड्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहेत, असे बालभारतीचे संचालक कृष्णकुमार पाटील यांनी सांगितले.

# पनवेलच्या अवैध फलकांचे तोडकाम सुरू

**। पनवेल । प्रतिनिधी।**

पनवेल महापालिका क्षेत्रात ३३ अवैध फलक मागील अनेक महिन्यांपासून आणि वर्षांपासून उभारले होते. यापूर्वीच्या महापालिका प्रशासनाने याबाबत कोणतीही भूमिका न घेतल्याने अवैध फलकांमुळे महापालिकेचा मोठा महसूल बुडाला आहे. मुंबई येथील फलकाच्या दुर्घटनेतील जीवितहानीनंतर फलकांचे तोडकाम महापालिकेने हाती घेतले आहे.

महापालिकेमध्ये पालिकेने परवानगी दिलेले आणि पालिकेची परवानगी घेतल्यावर त्या परवानगीची नूतनीकरणाची मुदत संपलेले, स्ट्रक्चरल ऑडीट न केलेले असे ८७ फलक पालिका क्षेत्रात आहेत. या फलकांना पालिका उपायुक्त मारुती गायकवाड यांनी नोटीस बजावून सात दिवसात फलक उभारलेल्या कंपन्या अथवा खासगी व्यक्तींनी पुढील सात दिवसात फलकाच्या मनोऱ्याचे स्ट्रक्चरल ऑडीट अहवाल व्हीजेटीआयकडून सादर करण्याची सूचना केली आहे. या दरम्यान पालिकेने सर्वेक्षण करुन पालिका क्षेत्रात किती अवैध फलक आहेत याची माहिती घेतली.

फलक लावणारा व्यापारी, पालिकेतील काही अधिकारी, स्थानिक गुंड आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगनमतातून हा अवैध व्यवसाय सूरु आहे. यापूर्वी सुद्धा पालिकेने अवैध फलकांवर कारवाईचा बडगा उघारला मात्र पालिकेचे वार्ड अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे अवैध फलक उभारण्यात आले होते. पालिकेचे आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या सूचनेनंतर उपायुक्त मारुती गायकवाड यांनी ३३ अवैध फलक तोडण्यासाठी पथक नेमले आहेत.



# प्रदूषण मंडळाचा हलगर्जीपणा
# औद्योगिक क्षेत्रातील गटारे अवकाळीने तुंबली

**। महाड । वार्ताहर ।**

चार दिवस पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे एकीकडे शेतकरी आणि नागरिकांचे पुरते हाल होत असतानाच औद्योगिक क्षेत्रात मात्र कारखान्यांचा अनागोंदी कारभार चव्हाट्यावर आला आहे. औद्योगिक क्षेत्रातील गटारे काळ्या निळ्या रंगाच्या पाण्याने तुंबली आहेत. यापूर्वी ज्या ठिकाणी अशा प्रकारच्या पाण्याबाबत तक्रारी झाल्या होत्या त्याठिकाणी असलेल्या कारखान्यांवर कारवाई झाली नसल्याने त्यांचे चांगलेच फावले आहे.

महाड औद्योगिक क्षेत्रातील लघु आणि रासायनिक कंपन्यांशी संबंधित व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांकडून दरवर्षी सांडपाणी नदीत अथवा शेजारील नाल्यात सोडण्याचे प्रकार गेली अनेक वर्ष सुरू आहेत. या कारखान्यांवर राजकीय वरद हस्त असल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे देखील हात कारवाईसाठी पुढे होत नाहीत. कांहीं महिन्यांपूर्वी टायटन कंपनी च्या शेजारील नाल्यात टायटन कंपनीच्या समोरील कंपन्यांतील रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करताच गटारात सोडले गेले होते. यावेळी तक्रारी झाल्या मात्र सदर सांडपाणी प्रकरणी कारवाई झाली नाही. यामुळे याच ठिकाणी आता देखील रासायनिक सांडपाणी रस्त्यालगत असलेल्या गटारातून थेट जिते टेमघर नाल्यामध्ये गेले आहे. यामुळे जिते गावाच्या शेजारून वाहणारा नाला पूर्णपणे प्रदूषित झाला आहे.

महाड औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी दिसून येत आहे. त्या औद्योगिक क्षेत्रातील सुदर्शन कंपनीपासून थेट आवश्यक गावापर्यंत पसरलेल्या नदीनाल्यांमध्ये सध्या अवकाळी पावसानंतर वाहणाऱ्या पाण्यातून रासायनिक सांडपाणी नदीच्या पाण्यात जाऊन मिसळत आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये हा प्रदूषणाचा शिक्का दूर करण्यासाठी महाड उत्पादक संघटनेने प्रयत्न केले होते या प्रयत्नांना काही अंशी यश मिळाले असले तरी औद्योगिक क्षेत्रातील अनेक लघु कंपन्या, रासायनिक क्षेत्राशी संबंधित लघु व्यवसायिक यांच्याकडून जाणीवपूर्वक रासायनिक सांडपाणी नाल्यात सोडण्याचा प्रकार केला जातो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांचे याकडे सपशेल दुर्लक्ष आहे. त्यातच महाड औद्योगिक वसाहतीमध्ये राजकीय हस्तक्षेप वाढल्यामुळे आणि या लघु कंपन्या, व्यवसायिक यांना राजकीय पाठबळ मिळत असल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी देखील कारवाई करत नाहीत.

## शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा बौद्धजन नवतरुण मंडळ,मुंबई आदर्श बौद्धजन मंडळ व माता रमाई महिला मंडळ म्हसळा यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण जगातील एकमेवाद्वितीय असा जाणता राजा, युगपुरुष आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे उद्घाटन सोहळा बुधवारी (दि.२२) संपन्न झाला. सदर कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक अस्मिता होटे, पुष्पा गायकवाड, सिद्धार्थ तांब, अनंत तांबे, कल्पेश येलवे, करण गायकवाड, संजय येलवे, सिद्धार्थ सारगे, संदीप गोपाळे, संतोष चापडेकर, महेश जाधव, दीपक मोरे, शैलेश मोहिते आदी ग्रामस्थ व महिला मंडळी उपस्थित होते.

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा संपन्न



**। पेझारी । वार्ताहर ।**

कोकण एज्युकेशन सोसायटीच्या प्र.ना.पाटील माध्यमिक शाळा कुर्डूस येथील एस.एस.सी.बॅच १९८७ मधील विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच 'अशोका रिसॉर्ट नवेनगर' येथे अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणामध्ये संपन्न झाला.

यामध्ये बॅचमधील ८५ टक्के मित्र मैत्रिणी उपस्थित होत्या. या प्रसंगी दिवंगत झालेल्या या बॅचमधील मित्र-मैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साधना पिंगळे व संदेश बांधणकर यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुनाथ शेरमकर यांनी सादर केले. प्रास्ताविकात शाळेतील तत्कालीन स्मृतींना उजाळा देण्यात आला. आपल्या शिक्षकांनी आपल्याला चांगले मार्गदर्शन केले. म्हणूनच आपण प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात चांगले कार्य करत आहोत म्हणत गुरुजनांबद्दल ऋण व्यक्त केले.

स्नेहभोजनानंतर संजय पिंगळे व विश्वास पाटील यांच्या गीत गायनाचा कार्यक्रम झाला. याचवेळी यांच्या गाण्यावर सर्व मित्र-मैत्रिणींनी आकर्षक नृत्य सादर केले. गाण्यांची अंताक्षरी ही खेळण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी उपस्थित भगिनींना शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व उपस्थित बंधूंना स्मृतीचिन्ह आणि गुलाबपुष्प देण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बॅचमधील उपस्थित सर्व मित्र-मैत्रिणींनी परिश्रम घेतले.

## पावसाळीपूर्व कामांना माथेरानमध्ये गती



**। माथेरान । वार्ताहर।**

माथेरानमध्ये पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाण्याचे लोंढे वाहत असल्याने काही ठिकाणी मातीची धूप होते. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या ब्रिटिशकालीन मोऱ्या दरवर्षी मातीच्या भरावाने भरतात. त्यामुळे पावसाचे पाणी थेट रस्त्यावरून वाहत असते. परिणामी रस्त्याची धूप होऊन रस्ते खड्डेमय होत असल्याने हातरिक्षा, घोडा तसेच पायी चालत जाणाऱ्या लोकांना खूपच त्रासदायक बनतात. यासाठी अनेक भागातील पावसाळी गटारांची साफसफाई करून चांगल्या पद्धतीने गटारे आणि मोऱ्याचे नियोजन करण्यात आले आहे. पावसाळी पाण्याचा निचरा होण्यासाठी गटारे आणि मोऱ्यांची कामे अत्यंत नियोजन पद्धतीने मुख्याधिकारी राहुल इंगळे, अन्सार महापुळे, नरेंद्र सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम प्रकारे मार्गी लावली जात आहेत.

# किल्ले पर्यटन सेवा महोत्सवात गुणी रत्नांचा सन्मान

**। रसायनी । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत कर्तबदार अनन्यसाधारण समाजसेवेची परंपरा आणि उत्तुंग विचारधारा असणाऱ्या रत्नांची ओळख होण्यासाठी तसेच त्यांच्या अंतर्भूत प्रतिभेला वाव मिळण्यासाठी किल्ले पर्यटन महोत्सव सेवा संशोधन केंद्र आणि अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद सिंधुदुर्ग यांच्या संयुक्त राष्ट्रीय बहुभाषिक साहित्य,कला, पर्यटन, सामाजिक संमेलन व सन्मान सोहळ्याचे आयोजन मामा वरेरकर नाट्यगृह, मालवण येथे करण्यात आले आहे.

या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून असिस्टंट व्हाईस प्रेसिडेंट डिझाईन इंडो स्पेस लॉजिस्टिक पार्क प्रायव्हेट लिमिटेड चे आर्किटेक्चर नीलिमा गुप्ता हे भूषवणार आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध उद्योजक डॉ. दीपक परब तसेच मानसोपचार तज्ञ व उद्योजक हेमंत कोळंबकर यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सिंधुदुर्गाचे सुपुत्र पद्मश्री परशुराम गंगावणे, अभिनेते व दिग्दर्शक संजय मोहिते, अभिनेत्री नृत्यदिग्दर्शिका डॉ. राजश्री खटावकर, गोव्याचे सुप्रसिद्ध गझल संगीतकार अजय नाईक, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अ.ना. रसनकुटे, मालवण येथील निवृत्त वैद्यकीय अधिकारी (स्त्री रोग तज्ञ), डॉ. अच्युत सोमवंशी हे मान्यवर लाभणार आहेत.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातील महनीय व्यक्तींची उपस्थितीमध्ये कौशिक गायकवाड, मोहोळ नाट्य अभिनेते नाना कोळंबकर, मच्छिंद्रनाथांची तपोभूमीचे व्यवस्थापक प्रभाकर सावंत, ज्येष्ठ साहित्यिक बाबला पिंटो, कणकवलीचे उद्योजक सुधीर जाधव, मुरबाड येथील समाजसेवक दिनेश उघडे, ठाणे येथील चित्रपट निर्मात्या नेहा निनाद धुरी, रत्नागिरी येथील नृत्य प्रशिक्षक अशोक आखाडे असून त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून कोकण जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या संमेलनामध्ये सुप्रसिद्ध गोव्याचे संगीतकार अजय नाईक यांचा गझलरंग हा गाण्याचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. सिंधुदुर्गातील पारंपरिक कलांचा अविष्कार पहावयास मिळणार आहे.

# अवकाळीच्या पंचनाम्यांची प्रतीक्षा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

अवकाळीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांवर शासनाची अवकृपा एकही शेतकऱ्याच्या शेतीचा तसेच मोडलेल्या घरांचा पंचनामा न झाल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. तालुक्यातील सर्वाधिक भात पीक नुकसान चांदई गावातील झाले असल्याचे कृषी विभागाचे म्हणणे आहे तरी देखील या गावात पंचनामे करण्यासाठी शासनाची यंत्रणा पोहचली नाही.

मागील आठवड्यात कर्जत तालुक्यासह महाराष्ट्रात अवकाळीने धुमाकूळ घातला. अचानक आलेल्या पावसाने शेतकरी वर्गाचे अतोनात नुकसान झाले. चांधई येथील भगवान कोळंबे यांचा गुरांचा वाडा तसेच नसरापूर येथील शेतकऱ्यांच्या घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तसेच राज



नाल्याच्या पाण्यावर खरीप हंगामात शेतीची लागवड केलेल्या चांधई, मार्केवाडी, तांबस, वडवली अशा अनेक गावातील शेतकऱ्यांच्या भातपिकाचे नुकसान झाले आहे.

या नुकसानीची भरपाई मिळावी तसेच त्या नुकसान झालेल्या शेतीचा पंचनामा करण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गाने केली होती परंतु आठवडा उलटून सुध्दा एकाही अधिकारी वर्गाने या नुकसानीची पाहणी केली नसल्याने शेतकरी वर्गात अत्यंत संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

चांधई येथील अनेक शेतकरी यांचे खरीप हंगामातील लागवडीचे अवकाळीने अत्यंत नुकसान झाले.या अवकाळी पावसाने वादळी वाऱ्यासह येऊन शेतकऱ्याच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून नेण्याचे काम केले असून शासन आणि सरकार यांनी सदर नुकसानीची पाहणी करणे क्रमप्राप्त होते.परंतु आज आठवडा उलटून गेल्यानंतरही एकाही अधिकारी वर्गाने साधी पाहणी केलेली नाही. काही शेतकऱ्यांच्या कापलेल्या भाताला पुन्हा मोड आले होते त्या शेतकऱ्यांना ना भात मिळाला ना पेंढा. या लागवडी करता शेतकऱ्यांना मजूर मिळत नाहीत आणि मिळाले तरी त्यांची मजुरीमध्ये मिळणाऱ्या भाताची पन्नास टक्के रक्कम जाते. त्यामुळे काही शेतकरी खरिपात पेंढा विकून आपले नुकसान भरून काढत असतात.

अवकाळी पावसामुळे भात आणि पेंढा असे दोन्ही गोष्टींचे नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाल्याचे पाहायला मिळत आहे.यातच शासनाकडून अधिकारी वर्गाने पंचनामा तत्काळ करणे गरजेचे असताना कुठल्याही अधिकाऱ्याने याकडे फिरकुनदेखील न पाहिल्याने शेतकरी वर्गामध्ये असंतोष आहे.

## नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर आढावा

**। महाड । वार्ताहर।**

महाड-पोलादपूर तालुक्यात झालेल्या अवकाळी पाऊस तसेच मान्सूनपूर्व तयारीच्या पार्श्वभूमीवर महाड प्रांताधिकारी कार्यालयात प्रशासनावतीने तातडीची आढावा बैठक घेण्यात आली. प्रांताधिकारी डॉ. ज्ञानोबा बाणापुरे यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस महाडचे तहसीलदार महेश शितोळे, पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शिवराज्याभिषेकदिन सोहळा व नैसर्गिक आपत्ती या विषयाच्या अनुषंगाने पार पडलेल्या बैठकीमध्ये अवकाळी पावसाने निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीविषयीची माहिती घेण्यात आली. त्याचप्रमाणे सुरक्षिततेच्या दृष्टीने नियंत्रण कक्ष स्थापना करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

# माजी विद्यार्थ्यांनी अनुभवले जुने क्षण



**। चोंढी । वार्ताहर ।**

सकाळी दहा साडे दहाची वेळ झाली आणि १९८८ साली दहावी झालेले वडके विद्यालय चोंढी किहीमचे माजी विद्यार्थी दातारवाडीमध्ये जमा झाले. दोन चार नव्हे तर अर्धा वर्गच जमा झाला होता. निमित्त होते होते माजी विद्यार्थ्यांच्या स्नेह मेळाव्याचे. व्हॉटसअँपच्या माध्यमातून गेले चार पाच वर्ष हा ग्रुप एकत्र येतो आणी गेट टूगेदर साजरा होतो.

३६ वर्ष उलटून गेली तरी तोच खोडकरपणा मज्जा मस्ती, गप्पाटप्पा यांनी दातारवाडी फुलून गेली होती. साधारण ११ ते १ वाजे यंत मस्त फनी गेम्सचे आयोजन केले होते. त्यामध्ये स्ट्रॉने थर्माकोलचे गोळे पकडणे, यासारखे लहान मुलांचे खेळ झाले. बर्फाचे गोळे खाऊन झाले. दरवर्षी दोन शिक्षक बोलवून त्यांचा सत्कार केला जातो. तसे यंदा शारीरिक शिक्षणाचे शिक्षक शांताराम राऊत आणि कार्यालयीन कामकाज पाहणारे भिडे यांना आमंत्रित करून त्यांना सन्मानित केले. जीवनातून थोडा विरंगुळा आणी मनातल्या काही अडचणी आणि आठवणींना वाट फुटावी. यासाठी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी ठाणे, मुंबई, विरार, खेड, चिपळूण आणि अलिबागचे माजी विद्यार्थी जमले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निलेश काठे तर नियोजन भोईर, वावेकर यांनी केले.

# एसटीच्या आरक्षण प्रणालीला प्रतिसाद

**। मुंबई। वृत्तसंस्था ।**

१ जानेवारी २०२४ पासून ऑनलाईन आरक्षण प्रणाली अद्यावत करुन नव्याने सुरु करण्यात आलेल्या तिकीट आरक्षण प्रणालीला उदंड प्रतिसाद मिळाला असून १ जानेवारी ते २० मे पर्यंत १२ लाख ९२ हजार इतक्या तिकीटाची विक्री या नव्या ऑनलाईन आरक्षण प्रणालीच्या माध्यमातून झाली आहे. याच काळात मागील वर्षी ९ लाख ७५ हजार तिकीटांची विक्री झाली होती म्हणजेच मागील वर्षाच्या तुलनेत ही संख्या सुमारे ३ लाखाने जास्त आहे. सध्या या ऑनलाईन आरक्षण प्रणालीव्दारे दररोज १० हजार तिकीटे काढली जात आहेत.

प्रवाशांना घरबसल्या एसटीचे तिकीट उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने एसटीने आपल्या npublic.msrtcors.com अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन तिकीट आरक्षण करण्याची सोय केली आहे. तसेच मोबाईल (भ्रमणध्वनी) वर MSRTC Bus Reservation अॅपच्या माध्यमातून देखील प्रवाशांना तिकीट काढता येते. या दोन्ही पध्दतीव्दारे तिकीट काढण्याच्या प्रणालीमध्ये १ जानेवारी, २०२४ पासून अमूलाग्र बदल करुन त्या अद्यावत करण्यात आल्या. परिणामी त्यातील अनेक दोषांचे निर्मूलन झाल्याने सदर ऑनलाईन आरक्षण प्रणाली प्रवाशांना वापरण्यास अत्यंत सोपी व सुलभ झाली आहे. तसेच या दोन्ही प्रणालीव्दारे प्रवाशांना अमृत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, दिव्यांग व्यक्ती अशा विविध सवलतीचे देखिल आगाऊ आरक्षण मिळू शकते. त्यासाठी महामंडळाने npublic.msrtcors.com या अधिकृत संकेतस्थळाबरोबरच MSRTC Bus Reservation अॅपच्या वापर प्रवाशांनी करावा असे आवाहन केले आहे.

## खारआंबोली येथे बौद्ध पौर्णिमा

**कोर्लई** : खार आंबोली येथे आंबोली बौद्ध समाज सेवा संघ स्थानिक मंडळ,मुंबई मंडळ, भिमाई महिला मंडळ, प्रज्ञा क्रीडा मंडळ, संघमित्रा बालिका यांच्या संयुक्त विद्यमाने वैशाखी बौद्ध पौर्णिमा महोत्सव २५८६ विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. या दिवशी सकाळी धम्म ध्वजारोहण, बुद्ध पूजा, महाप्रसाद करण्यात आला. सायंकाळी खार आंबोली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते कोंड आंबोली, भीमनगर ते लुंबिनी बुद्ध विहार अशी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

# उत्पादन शुल्कची झाडाझडती

**। पनवेल । वार्ताहर।**

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये गत शनिवारी रात्री घडलेल्या हिट अ‍ॅन्ड रन प्रकरणातील मद्यधुंद कारचालक असल्याचे आढळल्यानंतर पोलिसांनी अल्पवयीन मुला-मुलींना दारू देणाऱ्या पब्स आणि बारचालक-मालकांवर कारवाईला सुरुवात केली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला दारूविक्री करणाऱ्या सीबीडी सेक्टर-१५ मधील वाईन शॉप मालकावर कारवाई करून ताब्यात घेतले. पुण्यातील पोर्शे कार अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलांनी मद्य प्राशन केल्यानंतर भरधाव कार चालवून दोघांचा बळी घेतल्याचे उघडकीस आले आहे. या अल्पवयीन मुलांनी ज्या पब व बारमध्ये दारू प्यायली, त्या पब व बारच्या आस्थापनावर उत्पादन शुल्क विभागाने दारू पुरवल्याप्रकरणी कारवाई केली आहे.

दरम्यान, नवी मुंबई, पनवेलमध्ये देखील लेडीज बार आणि पबचा सुळसुळाट वाढला आहे. नवी मुंबईत गुपचूप रेव्ह पार्ट्या देखील होत असून यात बहुतेक अल्पवयीन मुले-मुली सहभागी होत असल्याचे यापूर्वी पोलिसांनी केलेल्या कारवाईत आढळले आहे.

नवी मुंबईच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने संजू वाईन शॉपवर पाळत ठेवून १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला दारुची विक्री करणारा व्यवस्थापक नवीन वासवानी याच्यावर एनआरआय पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून ताब्यात घेतले आहे. पब, बार तसेच हुक्का पार्लरमध्ये अल्पवयीन मुला मुलींना दारू पिण्यासाठी दिल्यास सदर आस्थापना चालकांवर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

**परवाना रद्द होणार**

बॉम्बे प्रोव्हिबिशन कायदा १९४९ आणि बॉम्बे फॉरेन लिकर नियम १९५३ अंतर्गत येणाऱ्या विविध तरतुदी आणि नियमांचे उल्लंघनकेल्यास सदर आस्थापनांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. तसेच संबंधित हॉटेल, पब आणि आस्थापनेला मद्य विक्रीबाबत देण्यात आलेले परवाने निलंबित अथवा रद्द करण्यात येईल असा इशारादेखील देण्यात आला आहे.

**निवडक**

## खालापुरात मान्सूनपूर्व आढावा

**रसायनी :** संभाव्य नैसर्गिक आपत्तीत आपले व्यवस्थापन मजबूत ठेवा आणि आपत्ती निवारण करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करू या, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे. खालापूर तालुकास्तरिय मान्सून पूर्व आढावा बैठकीच्या अनुषंगाने तहसीलदार तथा तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती खालापूर यांचे अध्यक्षतेखाली खालापूर तहसील कार्यालयात तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय प्रमुखांची बैठक संपन्न झाली.

## पक्ष्यांचे आश्रयस्थान हरपले

**पाली :** काही दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसाचा फटका पशुपक्ष्यांनाही बसला आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक पक्ष्यांची घरटी व अंडी पडली आहेत. शिवाय नवे घरटे बांधण्यातही बाधा येत असल्याचे नोंद पक्षी अभ्यासक शंतनू कुवसेकर यांनी केली आहे. गेल्या आठवड्यात उष्मा काहीसा कमी झाल्याने पशुपक्षी सुखावले होते, मात्र दोन-तीन दिवस पडलेल्या वादळी पावसामुळे पक्ष्यांची मोठी वाताहत झाली. झाडांवरील घरटी कोसळल्याने पक्ष्यांचा आश्रय हरपला आहे.

## उरण येथे वधू-वर मेळावा

**उरण :** अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर दिंडोरी प्रणित यांच्या वतीने रविवारी (दि.२६) श्री स्वामी समर्थ केंद्र शिवसेना शाखेजवळ उरण येथे मोफत विवाह संस्कार वधू-वर मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा सर्व जातीधर्मासाठी आहे. २१ ते ४५ वर्ष वयोगटासाठी सर्व स्थळ घटस्फोटीत किंवा पुनर्विवाह यासाठी विनामूल्य प्रवेश व विना मूल्य शुल्क आहे. तरी सामाजिक सेवेचा लाभ घ्यावा, अशी विनंती आयोजकांनी केली आहे.

## छप्पर टाकण्यासाठी पुढाकार

**पनवेल :** कामोठे येथील पोस्ट कार्यालयाबाहेर मागणी केल्यानंतर सुद्धा दोन वर्षांपासून तात्पुरत्या स्वरुपात उन्हाच्या झळा लागू नये म्हणून छप्पर उभारण्याची मागणी नागरिकांकडून केली जात होती. सरकारी काम आणि बारा महिने थांब या उक्तीप्रमाणे पोस्टाचा कारभार सुरू असल्याने नागरिकांची मागणी बासनात पडून होती. अखेर नागरिक पोस्टाबाहेर रांगा लावून त्यांची कामे करत असल्याने दोन व्यक्तींनी पुढाकार घेऊन पोस्ट कार्यालयाबाहेर छप्पर उभारल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## नांगरवाडीत 'वणवा' नाट्यप्रयोग

**रामराज :** श्री धावीर नाट्य मंडळ आयोजित व सुनील धुमाळ लिखित आणि दिग्दर्शित वणवा हे एड्सवर आधारित नाटक रामराज विभागातील नांगरवाडीच्या रंगभूमीवर झालं. अनेकदा समाजामध्ये गैरसमजाचे चित्र निर्माण होते. या गैरसमजूतीमुळे नात्यांमध्ये येणारा माणसिक ताण, त्यातला दुरावा हे स्वाभाविकपणे या नाटकाने दर्शन घडवले आहे. नाटकातील आशय हा समाज प्रबोधन करणारे नाटक आहे. सुनील धुमाळ यांनी समाजातील वास्तवाचा उभा आडवा छेद आक्रमक पद्धतीने मांडला आहे.

# शाळांमध्ये इंग्रजीचे बंधन शिथिल?

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**जगातील बहुतांश देशांमध्ये व्यवहाराची भाषा म्हणून वापरात असलेल्या इंग्रजीचे अभ्यासक्रमातील बंधन शिथिल होत आहे. सध्या पहिली ते १२ वी पर्यंत इंग्रजीचे शिक्षण अविनार्य आहे. मात्र यापुढे ११वी आणि १२ वीमध्ये इंग्रजीची सक्ती नसेल, असे राज्याच्या नव्या अभ्यासक्रम आराखड्यातून समोर आले आहे. दहावीपर्यंत इंग्रजी भाषेचे नेमके स्थान काय असेल याबाबत संदिग्धता आहे.**



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने राज्याचा अभ्यासक्रम आराखडा जाहीर करण्यात आला असून त्यावर गुरूवारपासून (२३ मे) ३ जूनपर्यंत सूचना आणि आक्षेप नोंदवता येणार आहेत. मातृभाषा आणि भारतीय भाषांना आराखड्यात विशेष महत्व देण्यात आल्याचे दिसते आहे. त्याचबरोबर परदेशी भाषा शिक्षणाचे पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावेत अशीही सूचना देण्यात आली आहे. सध्या पहिलीपासून बंधनकारक असलेल्या इंग्रजी भाषेच्या शिक्षणाबाबत मात्र संदिग्धता दिसत आहे.

तिसरीपासून बारावीपर्यंत मातृभाषा किंवा परिसर भाषेचे शिक्षण बंधनकारक करण्यात आले आहे. तिसरी ते पाचवीच्या वर्गांना प्रथम भाषा म्हणजेच मातृभाषेबरोबरच अजून एका भाषेचे शिक्षण बंधनकारक आहे. सद्यास्थितीत पहिलीपासून इंग्रजी आणि मातृभाषेचे शिक्षण बंधनकारक आहे. मात्र प्रस्तावित आराखड्यात दुसरी भाषा इंग्रजीच असावी असे बंधन घातलेले नाही. दुसरी भाषा ही प्रथम भाषेव्यतिरिक्त कोणतीही असावी असे नमूद करण्यात आले आहे. सहावी ते दहावीपर्यंत त्रिभाषासूत्र आहे. सध्या मातृभाषा, इंग्रजी आणि तिसरी भाषा पर्यायी अशी रचना आहे.

मात्र, प्रस्तावित आराखड्यात प्रथम भाषा मातृभाषा, दुसरी कोणतीही भारतीय भाषा आणि तिसरी कोणतीही परदेशी भाषा असे सूचीत करण्यात आले आहे. इंग्रजीची गणती परदेशी भाषांत असल्यामुळे इंग्रजी शिकण्याची मुभा विद्यार्थ्यांना असली तरी त्याचे बंधन नसेल. इंग्रजी पर्यायी भाषा म्हणून निवडता येऊ शकेल असे आराखड्यातील तरतुदींनुसार दिसते आहे. मात्र इंग्रजी अनिवार्य असेल की नाही याबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. अकरावी आणि बारावीला दोन भाषा शिकणे बंधनकारक आहे. त्यातील एक भाषा भारतीय असावी आणि दुसरी भारतीय किंवा परदेशी भाषा शिकता येईल. अकरावी, बारावीला सध्या असलेले इंग्रजीचे बंधन काढून टाकण्यात आले आहे. इंग्रजी भाषा अनिवार्य नसेल असे आराखड्यात नमूद करण्यात आले आहे.

### पर्याय कोणते?

**भारतीय भाषा : मराठी, संस्कृत, हिंदी, कन्नड, गुजराती, ऊर्दू, तामिळ, तेलगू, मल्याळम, सिंधी, बंगाली, पंजाबी, पाली, अर्धमागधी, प्राकृत, अवेस्ता पहलावी**

**परदेशी भाषा : इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, रशियन, जपानी, स्पॅनिश, चायनीज, पर्शियन, अरेबिक**

## पुस्तकपेढी योजनेचा पेण तळे येथे शुभारंभ



- **२०० विद्यार्थ्यांना लाभ मिळणार**
- **मारूती फाऊंडेशनचा अनोखा उपक्रम**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोरोना महामारी काळात गरजूंना शिक्षणाच्या प्रवाहात सहाय्यभूत व्हावे या हेतूने सुरू करण्यात आलेल्या मारुती फाऊंडेशनच्या पुस्तकपेढी योजनेचा मंगळवारी (दि.२१) पेण तळे येथे शुभारंभ करण्यात आला. पुस्तकपेढी योजनेचे हे चौथे वर्ष असून यावर्षी फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध शैक्षणिक साहित्याची मदत गरजूंना देण्यात येणार आहे.

गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत व्हावी हा उद्देश ठेवून इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात वर्षभरासाठी पूर्णपणे मोफत पाठ्यपुस्तक संच भेट दिला जातो. वर्षभर संच वापरल्यानंतर फाऊंडेशनकडे परत केला जातो. सदर संच दुसऱ्या विद्यार्थ्यांना वापरण्यास मिळतो. त्यामुळे विद्यार्थी पालकांना वेळेत पुस्तके मिळतात व खरेदी करण्याचा आर्थिक भार हलका होत आहे. आजपर्यंत गेल्या चार वर्षात १५० हून अधिक विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

पेण तळे येथे गावाचे उपाध्यक्ष सीताराम पोटले, सामाजिक कार्यकर्ते मंगेश भागडे, नयन पोटले, नारायण मोंडे, प्रकाश मांडवकर, साईनाथ पोटले व फाऊंडेशनचे अध्यक्ष अजित शेडगे यांच्या हस्ते या योजनेचा या शैक्षणिक वर्षातील शुभारंभ करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या अनुया आपटे, निर्धार सामाजिक संस्थेचे अध्यक्ष निलेश अहिरे, सामाजिक कार्यकर्ते प्रसाद उभारे, किशोर वेदपाठक, नागरिक फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. दीपक देशमुख, भालचंद्र खाडे, शंकर शिंदे, सुशील कदम आदी मान्यवरांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या या योजनेसाठी बाळाराम मांडवकर, सुमित मोंडे, अरुणा मांडवकर, अनघा शेडगे यांचे मोलाचे योगदान व मार्गदर्शन लाभत आहे.

## विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**। उरण । वार्ताहर ।**



- **विंधणे ग्रामपंचायत हद्दीतील घटना**

विंधणे ग्रामपंचायत हद्दीत दुधाळ म्हशीच्या अंगावर विद्युत वाहक तार पडल्याची घटना गुरूवारी (दि.२३) सकाळी घडली. या घटनेत विजेच्या धक्का लागून म्हशीचा तडफडून मृत्यू झाला. यासंदर्भात पशुसंवर्धन अधिकारी, पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर घटनेचा पंचनामा केला आहे.

लहू भिवा भोईर हे आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी दुधाचा व्यवसाय करत आहेत. त्यांच्या गोठ्याजवळून महावितरण कंपनीच्या विद्युत वाहक तारा जात आहेत. सदर धोकादायक विद्युत वाहक तारा हटविण्यासाठी लहू भोईर यांनी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांकडे मागणी केली होती. परंतु मागणीची दखल घेतली नाही. लहू भोईर यांच्या गोठ्याजवळील म्हशीच्या अंगावर विद्युत वाहक तार पडल्याने म्हशीने तडफडून हंबरडा फोडला. त्यामुळे लहू भोईर यांचे कुटुंब जागे झाले. त्यांनी उर्वरित म्हशीच्या गळ्यातील दोर कापले. त्यामुळे त्या म्हशी बचावल्या आहेत.

झालेल्या शॉर्टसर्किटमुळे लहू भोईर यांची सून, मूलगा थोडक्यात म्हशीच्या बचाव कार्यातून बचावले असले तरी अंगावर विद्युत वाहक तार पडल्याने एका दुधाळू म्हशीचा तडफडून मृत्यू झाला आहे.

पशुसंवर्धन अधिकारी पोलीस कर्मचाऱ्यांनी सदर घटनेचा पंचनामा सुरू केला आहे. लहू भोईर यांच्या कुटुंबियांचे उदरनिर्वाहाचे साधन हिरावण्याचा प्रयत्न करणाऱ्या महावितरण कंपनीच्या कर्मचारी, अभियंत्यांवर कारवाई करावी तसेच भोईर कुटुंबियांना नुकसानभरपाई तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी नामदेव ठाकूर यांनी केली आहे.

## लतिका वरखले यांना देवाज्ञा



**खांब :** नडवली गावच्या धार्मिक वृत्तीच्या ह.भ.प.लतिका सदाशिव वरखले यांना बुधवारी (दि.२२) वृद्धापकाळाने वयाच्या ९० व्या वर्षी साईनगर खांब येथील निवासस्थानी देवाज्ञा झाली. त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, पुतणे, पुतण्या, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी ३१ मे रोजी तर अंतिम धार्मिकविधी २ जून रोजी साईनगर खांब येथील त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## माणगावात रुग्णांच्या सेवेला सिटीस्कॅन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**



दक्षिण रायगड मधील तसेच महामार्गावरील अपघातग्रस्त व इतर रुग्णांना तातडीचे उपचार मिळावेत यासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीनची अत्यंत गरज होती. या सिटीस्कॅन मशीनसाठी अनेक रुग्ण व नातेवाईकांकडून मागणी होत होती. ही सिटीस्कॅन सेवा गरीब व सामान्य रुग्णांना उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना मोफत मिळणार आहे. खाजगी व इतर ठिकाणी उपचार घेणाऱ्या रुग्णांना ती अत्यल्प दरात उपलब्ध राहणार आहे.

सिटीस्कॅन उपजिल्हा रुग्णालयात बसविले असून रुग्णांच्या सेवेला आता ते उपलब्ध झाले आहे. माणगावात हे सिटीस्कॅन सेवा सुरु झाल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

उपजिल्हा रुग्णालयात बसविलेले सिटीस्कॅन मशीन ही एका खाजगी कंपनीमार्फत सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर शासनांनी बसविले आहे. ही सेवा सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन व क्रस्ना डायग्नोस्टिक्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर बसविण्यात असून ते २४ तास अत्यावश्यक सेवा म्हणून उपलब्ध राहणार आहे. या मशीनसाठी स्वंतत्र वातानुकूलित खास कक्ष उभारण्यात आला आहे.

दक्षिण रायगडमध्ये शासकीय सिटीस्कॅनची व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना खाजगी सिटीस्कॅन करून घ्यावे लागत होते. त्याचे दर अव्वाची सव्वा असून ते सामान्य व गरीब रुग्णांना परवडणारे नाहीत. उपजिल्हा रुग्णालयातील हे मशीन सुरु झाल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्ण त्यांच्या नातेवाईकांना उपयोग होणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील खेड, दापोली, मंडणगड व मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातग्रस्त व लहान मोठया आजारावरील रुग्णांवर तातडीचे उपचार व्हावेत व त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगाव येथे मध्यवर्ती ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय उभारले आहे. अपघातग्रस्त व अन्य रुग्णांवर इथेच उपचार व्हावेत व त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगावला सिटीस्कॅनची गरज होती. मुंबई-गोवा महामार्गावर लहान मोठा अपघात झाल्यास त्याच्यावर तातडीने उपचार करून त्यांचे प्राण वाचावे यासाठी माणगाव येथे शासनांनी शंभर खाटांचे उपजिल्हा रुग्णालय उभारले आहे. येथे सध्या लहान-मोठया शस्त्रक्रिया केल्या जातात.

## आता दहावीच्या निकालाची उत्सुकता

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्य मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर आता दहावीच्या निकालाची उत्सुकता आहे. दहावीची परीक्षा १ ते २६ मार्च या कालावधीत घेण्यात आली. या परीक्षेसाठी १६ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे दहावीच्या निकालाविषयी उत्सुकता निर्माण झाली आहे.

राज्य मंडळाने बारावी आणि दहावी या दोन्ही परीक्षांचे निकाल गेल्यावर्षीपेक्षा लवकर जाहीर करण्याच्या दृष्टीने नियोजन केले होते. त्या प्रमाणे बारावीचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला. बारावीच्या निकालानंतर दहावीचा निकाल कधी जाहीर होणार याकडे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागले आहे. हाती आलेल्या माहितीनुसार राज्य मंडळाकडून दहावीचा निकाल २७ मे रोजी जाहीर केला जाणार असून, राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनीही त्यास दुजोरा दिला.

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळाकडून कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले होते. त्यात राज्य स्तरावरून भरारी पथकांची नियुक्त करण्यात आली होती. तसेच जिल्हा स्तरावरही स्वतंत्र पथके नेमण्यात आली होती. त्यामुळे बारावीच्या परीक्षेत गैरप्रकारांची संख्या घटली, तर दहावीच्या परीक्षेत गैरप्रकारांची संख्या वाढल्याचे निदर्शनास आले.

## एसटी सुरू करण्यासाठी आगार व्यवस्थापकांना निवेदन

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**



प्रवासी वर्गाची होणारी अडचण लक्षात घेऊन सकाळी ७.१५ वाजता अलिबाग-मुरूड एसटी सुरू करावी, त्याकरिता मुरूड एसटी आगारव्यवस्थापकांकडे मुरुड जंजिरा रहिवासी संघाकडून निवेदन सादर करण्यात आले. यावेळी दिलीप गुंजाळ, अशोक कमाने, दिगंबर केळुस्कर, विकास मिरजणकर, अशोक दिवेकर, शैलेश वारेकर, उत्तम पाटील आदी सदस्य उपस्थित होते.

अलिबागवरुन सकाळी ८.१५ वाजता मरूडला एसटी सुटत असल्याने निमशासकीय कर्मचारी व विद्यार्थी किंवा सामान्य नागरिक यांना सकाळी नऊ वाजण्याच्या वेळेत मुरूडला पोहचता येत नाही. त्यामुळे सर्व प्रवासी वर्गाचे हाल होत आहेत. त्याचबरोबर वृत्तपत्र ही वेळेत मिळत नसल्याने वृत्तपत्र वाचक यांनी ही नाराजी दर्शवली आहे. वेळेत मिळत नसल्याने वृत्तपत्राचा खप कमी झाला आहे. तरी सामान्य नागरिक व विद्यार्थ्यांच्या समस्याचा विचार करुन आगार व्यवस्थापकांनी अलिबागवरुन मुरूड एसटी सकाळी ७.१५ वाजता सोडावी.अशी मागणी मुरूड जंजिरा रहिवासी संघाकडून करण्यात आली आहे.

## पावसाळ्यापूर्वी गटारांची साफसफाई

**तळा :** पावसाळा उंबरठ्यावर येऊन ठेपला असल्याने तळा नगरपंचायतीमार्फत शहरातील गटारांची स्वच्छता करण्यात येत आहे. बाजारातील गटारांमध्ये पिशव्या व इतर कचरा अडकून राहिल्यामुळे पावसाचे पाणी व गटाराचे सांडपाणी रस्त्यावरून वाहते. यामुळे संपूर्ण बाजारपेठेत दुर्गंधी पसरलेली असते. पाण्याला जाण्यासाठी इतर मार्ग नसल्याने बाजारपेठेत ठिकठिकाणी हे पाणी साचून डबके तयार होतात. साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांची साथ येण्याची असते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून नगरपंचायतीकडून गटारांची स्वच्छता करण्यात येत आहे.



## निराधारांसाठी बचाव मोहीम

**। पनवेल । वार्ताहर ।**

सील आश्रम आणि नवी मुंबई पोलिसांच्या सहकार्याने १५ दिवसांच्या कालावधीसाठी परिसरात बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. या स्तुत्य उपक्रमाचे नाव रेस्क्युनाइट २०२४ मिशन असे असून त्याद्वारे पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्त्यावर भटकणाऱ्या निराधार आणि गरजूंना वैद्यकीय मदत आणि त्यांचे पुनर्वसन करण्यात येऊन त्यांना चांगले जीवन प्रदान करण्याचे कार्य करण्यात येणार आहे.

या मिशनचे उद्घाटन नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते सील आश्रम, वांगणी - नेरे, येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला अल्पसंख्याक आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. अब्राहम मथाई, मिलिंद वाघमारे , सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, वपोनि अनिल पाटील, वपोनि पृथ्वीराज घोरपडे, सील आश्रमाचे संस्थापक के. एम. फिलिप, मुख्य समन्वयक लाइजी वर्गीस (रेस्क्युनाइट ड्राइव्ह २०२४) आदी उपस्थित होते.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण-बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३
- टायपिंग आणि झेरॉक्स करीता मुले मुली पाहिजेत संपर्क - ९९२२५८२५८०
- अलिबाग मधील ऑफिसकरीता एक्सपेरिएंस्ड ड्राफ्ट्समन, आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय२५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# खासगी बालवाड्या अद्याप नियमाविना

**। रायगड । प्रतिनिधी ।**

**रायगडात गल्लोगल्ली सुरू असलेल्या खासगी बालवाड्यांसाठीची नियमावली राज्य शासनाच्या स्तरावर अजूनही निश्चित झालेली नाही. खासगी बालवाड्यांवर नियंत्रण कोणत्या विभागाने ठेवायचे, याबाबत राज्य शासनाच्या स्तरावर संभ्रम असून, याबाबतचे धोरण निश्चित झाल्यावरच खासगी बालवाड्या सरकारच्या नियंत्रणाखाली येणार आहेत.**


(संग्रहित)

आतापर्यंत तीन ते सहा वर्षे वयोगटासाठीचे पूर्वप्राथमिक शिक्षण औपचारिक शिक्षणाचा भाग नव्हते. त्यामुळे शासकीय अंगणवाड्या वगळता खासगी अंगणवाड्या, नर्सरी यांच्यावर कोणाचाही अंकुश नव्हता. खासगी बालवाडी कोणालाही सुरू करता येत होती. त्यामुळे गल्लोगल्ली बालवाड्या, नर्सरी सुरू झाल्या. त्यातून खासगी बालवाड्यांमध्ये स्पर्धाही निर्माण झाली. अव्वाच्या सव्वा शुल्क आकारले जाऊ लागले. मात्र, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये तीन ते सहा या वयोगटासाठीची तीन वर्षे पूर्वप्राथमिक शिक्षणासाठी देण्यात आली आहेत. त्यामुळे या खासगी बालवाड्या आता औपचारिक शिक्षणाचा भाग होणार आहेत. परिणामी, बालवाडी, नर्सरी यांच्यासाठीही नियमावली तयार केली जाणार आहे.

शिक्षण विभागाने काही महिन्यांपूर्वी नियमावलीचा मसुदा तयार करून शासनाला सादर केला आहे. या नियमावलीचे विधेयकात रूपांतर करून ते विधानसभेत मंजूर करावे लागणार आहे. खासगी बालवाड्यांसाठीच्या नियमांमध्ये मान्यता प्रक्रिया, विद्यार्थी संख्या, सुरक्षा मानके, सुविधा, शुल्क, बालवाड्यांची वेळ, कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता अशा घटकांचा समावेश असेल. मात्र, राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभाग, शालेय शिक्षण विभाग, एकात्मिक बालविकास सेवा या तीन विभागांपैकी कोणत्या विभागाच्या अखत्यारित खासगी बालवाड्यांचा समावेश करायचा याबाबत अद्याप निर्णय झाला नसल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील शासकीय बालवाड्यांध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार कामकाज सुरू होणार असताना खासगी बालवाड्यांसाठीच्या प्रस्तावित नियमावलीसंदर्भात अद्याप कार्यवाही झालेली नाही.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात प्रस्तावित केल्यानुसार खासगी बालवाड्यांसाठीच्या नियमावलीबाबत शासनाच्या स्तरावर चर्चा सुरू आहे. त्याबाबतचे धोरण निश्चित झाल्यावर पुढील कार्यवाही केली जाईल. खासगी बालवाडी, नर्सरी यांनाही शिक्षण विभागाने तयार केलेला अभ्यासक्रम लागू असेल, असे प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी सांगितले.

# अनधिकृत बारवर कारवाई कधी?

## पुण्यासारखी घटना झाल्यावर जाग येणार का?

**। उरण । प्रतिनिधी ।**

पुण्यातील घटनेनंतर प्रशासनावर ताशेरे ओढले जात आहेत. तशीच परिस्थिती उरण परिसरात सुरू आहे. याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन कारवाईचा बडगा उगारावा अन्यथा पुण्यासारखी घटना घडण्यास वेळ लागणार नाही अशी चर्चा उरणमध्ये सुरू आहे. यापूर्वी उरणमध्ये अशीच घटना घडून पती-पत्नीचा मृत्यु झाला तर एका चिमुरडीवर आजही उपचार सुरू आहेत. याप्रकरणाची झळ पोलीस अधिकाऱ्यांना बसून त्यांची तडकाफडकी बदली करण्यात आली होती.

उरण शहरात व तालुक्यात असलेल्या रेस्टॉरंट व बार, कॅफे हे नियमांचे उल्लंघन करून पहाटे तीन चार वाजेपर्यंत सुरू असतात. तसेच तालुक्यात अनेक ठिकाणी राजकीय नेत्यांच्या वरदहस्ताने अनधिकृत ढाबे उभारून त्या ठिकाणी बेकायदेशीर दिवस-रात्र गावठी व देशी दारूची खुलेआम विक्री केली जात आहे. याचा त्रास परिसरातील रहिवाशांना होत आहे.

काही रहिवाशांनी उत्पादन शुल्क विभाग, नगरपालिका, ग्रामपंचायत तसेच पोलीस स्टेशनला तक्रारी करूनही प्रशासन कोणतीच कारवाई करताना दिसत नाही. तीन-चार दिवसांपूर्वी पुण्यातील अपघाताच्या घटनेनंतर पोलिसांवर कारवाईत दिरंगाई आणि कुचराई झाल्याचा आरोप केला जात आहे. पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी स्पष्टीकरण दिल्यानंतरही जनतेचा रोष कायम आहे.

या घडामोडीच्या पार्श्वभूमीवर अनिल देशमुख यांनी थेट गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला होता. त्यानंतर फडणवीसांनी दोन अवैध पब बंद करण्याचे आदेश दिले होते. आता पुण्यातील अवैध पबवर बुलडोझर चालवण्यात येत आहे. कोरेगाव पार्कमध्ये बेकायदेशीरपणे बांधलेले पब पाडण्याचे काम सुरू झाले आहे.

उरणमधील बार, कॅफे व अनधिकृत ढाबे यांना कोणाता राजकीय पक्ष अथवा नेता आश्रय देत आहे. याची चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बार, कॅफे व अनधिकृत ढाबे यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी उरणच्या जनतेकडून जोर धरू लागली आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील (नैना) गावांमध्ये उभारण्यात आलेले बेकायदेशीर व अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग्ज) काढून टाकणेबाबत.**

सदर जाहीर सूचनेद्वारे सर्व जनतेस / जाहीरात फलकधारक/ जमीनमालक /जाहीरातदार यांना सूचित करण्यात येत आहे की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) साठी शासन अधिसूचना क्र. टीपीएस - १७१२/४७५/ प्र.क्र. -९८/१२/नवि -१२ दि. १३/०१/२०१३ अन्वये सिडको महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर क्षेत्रामध्ये खालील गावांचा समावेश आहे.

**पनवेल तालुका :-**

१. आदई २. शिल्लोत्तर रायचुर ३. आकुर्ली ४. नेवाळी ५. भोकारपाडा ६. बोनशेत ७. कोप्रोली ८. हरिग्राम ९. वाकडी १०. विचुंबे ११.उसर्ली खुर्द १२. देवद १३. पालीदेवद १४. शिवकर १५. मोहो १६. विहिघर १७. नेरे १८. कोरल १९. केवाळे २०. खानाव २१. चिंचवली तर्फे वाजे २२. पाले बुद्रूक २३. वलप २४. हेदूटणे २५. कानपोली २६. चिंध्रण २७. महालुंगी २८. खेरणे खुर्द २९. अंबिवली ३०. वांगणी तर्फे वाजे ३१. चिखले ३२. पालीखुर्द ३३. लोणीवली ३४. वारदोली ३५. भेरले ३६. भिंगार ३७. लाडीवली ३८. नितळस ३९. निताळे ४०. वावंजे ४१. महोदर ४२. चिंचवली तर्फे तलोजे ४३. आंबे तर्फे तळोजे ४४. शिरवली ४५. कोंडप ४६. वांगणी तर्फे तळोजे ४७. मोर्बे ४८. भिंगारवाडी ४९. मोहोपे ५०. पोयंजे ५१. पाली बुद्रक ५२. बेलवली ५३. सांगडे ५४. बोर्ले ५५. कोन ५६. आपटे ५७. कोंडले ५८. खैरवाडी ५९. रिटघर ६०. उसर्ली बुद्रूक ६१. उमरोली ६२. दुंदरे ६३. शिवणसई ६४. तामसई ६५. आंबे तर्फे वाजे ६६. धामणी ६७. कोलखे ६८. डेरवली ६९. पळस्पे ७०. कुडावे ७१. नांदगांव ७२. वडवली ७३. तुरमाळे ७४. चिरवत ७५. देहरंग ७६. मालडुंगे ७७. धोधनी ७८. गाढे ७९. वाजे ८०. चेरवली ८१. सांगुर्ली ८२. शिरढोण ८३. चिंचवण ८४. कल्हे ८५. मोसारे ८६. नानोशी ८७. पाटणोली ८८. तुराडे ८९. वावेघर ९०. गुलसुंदे ९१. आकूलवाडी ९२. चिपळे

**उरण तालुका :-** ९३.पोही ९४.रानसई

सदर अधिसुचनेच्या दिनांकापासून म्हणजेच दि. १३/०१/२०१३ पासून नैना क्षेत्रातील कोणत्याही प्रकारच्या बांधकामासाठी / विकासासाठी (गावठाण क्षेत्रासह) परवानगी देण्याचे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोस (बांधकाम परवानगी विभाग (नैना) सिडको यांना) आहेत. अन्य कोणत्याही प्राधिकरणांस बांधकाम / विकास परवानगी देण्याचे अधिकार नाहीत.

उपरोक्त ९४ गावांमध्ये अनेक ठिकाणी छोटी / मोठी अनधिकृत जाहिरात फलक (होर्डिंग्ज) असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर जाहिरात फलकांना सिडकोतर्फे कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. सबब सदर सर्व जाहीरात फलक (होर्डींग्ज) हे बेकायदेशीर व अनधिकृत आहेत.

नुकतेच घाटकोपर मुंबई येथे पाऊस आणि वादळ यामुळे दिनांक १३/०५/२०२४ रोजी होर्डींग कोसळून झालेल्या दुर्घटनेत १७ जणांचा दुर्दैवी मुत्यू व ७४ जण जखमी झाले असून मोठी जिवित व वित्त हानी झालेली आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून मोठ्या उंचीच्या या जाहीरात फलकां (होर्डींग्ज) मुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी सदर जाहिरात फलक (होर्डींग्ज) धारक/जमिनमालक व जाहिरातकर्ते कंपन्या/व्यक्ती /संस्था यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, नैना अधिसूचित क्षेत्रातील वर नमूद केलेल्या ९४ गावांमधील बेकायदेशीर व अनधिकृत जाहिरात फलक (होर्डींग्ज) त्वरीत काढुन टाकावेत अन्यथा आपणावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल तसेच सदर जाहिरात फलक (होर्डींग्ज) कोसळुन जिवित किंवा वित्त हानी झाल्यास वा कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास आपणास सर्वस्वी जबाबदार धरण्यात येवून आपणावर गुन्हे दाखल करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक:- २४.०५.२०२४
ठिकाण:- नवी मुंबई

**मुख्य नियंत्रक, (अनधिकृत बांधकामे)**
**नैना, सिडको**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०२७/२०२४-२५

# क्षितीजचे क्षितीजापलीकडील यश

**। पाली । वार्ताहर ।**

नुकताच सीबीएसई बोर्डाचा इयत्ता १२ वी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. सुधागड तालुक्यातील विडसई गावचा व सध्या पुण्यात शिकत असलेला क्षितीज महेश वाघमारे याने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसइ) इयत्ता १२ वीच्या परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवित पीएम केंद्रीय विद्यालय रेंजहिल खडकी या शाळेत प्रथम येण्याचा मान पटकावला.



सुधागड तालुक्यासारख्या भौगोलिक दृष्ट्या मागास असलेल्या तालुक्यातून नोकरी धंद्याच्या निमित्ताने पुण्यात गेलेल्या महेश वाघमारे यांनी आपला मुलगा क्षितीज याला चांगले शिक्षण मिळून पुढे त्याची चांगली उन्नती व्हावी. या हेतूने पीएम केंद्रीय विद्यालय रेंझहिल सारख्या इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेश घेतला. क्षितीजने देखील वडिलांच्या विश्वासाला व अपेक्षेला साथ देत चांगले शिक्षण घेतले. दहावीत देखील क्षितीज ८० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाला होता. मात्र हीच कास मनात धरून आई-वडिलांच्या स्वप्नांना पंख देत क्षितीजने बारावीत देखील ९१ टक्के गुण मिळवून आई-वडिलांचे नाव उंचावले आहे. यासाठी त्याला वडील महेश वाघमारे व आई राजश्री वाघमारे यांचे मोलाचे योगदान लाभले.

बारावी नंतर पुढे बीबीए करुन कॉमर्स क्षेत्रात करिअर करण्याची इच्छा व जिद्द क्षितीजने व्यक्त केली. क्षितीज च्या या यशाबद्दल मित्रमंडळी, नातेवाईक व सुधागड तालुक्याच्यावतीने त्याचे अभिनंदन होत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

दिनांक : २४ मे २०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमूद पत्त्यावरही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-शिलार, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे-आर-पॉ. | रूपये | पैसे |
| दिपक अंजली पांडे | १७ | ४ | ०-१२-०० | ० | ०९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता.कर्जत जि.रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक-२४/०५/२०२४
मो.नं.९१५८२७७७२८

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील नमूद मिळकतीचे विद्यमान मालक चिराम चैनमल जैन रा. मलबारहिल मुंबई यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे स्नेही यांच्याबरोबर ठरलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग, जि. रायगड | ४२० | ०-३५-७० | ८.५० |

वर नमूद मिळकतींपैकी श्री. चिराग चैनमल जैन यांच्या मालकीची ताबेकब्जावहिवाटील ०-२६-७० हे. आर. मिळकतींपैकी ०-०५-७० हे. आर., मिळकतीची

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज् अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे स्नेहीवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २४/०५/२०२४

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
रा. श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२३४८१७३/८८०५३२८६४६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे मोहिली तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथिल खालील वर्णनाची जमिनीची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार उषाकिरण संजय निकम, वीणा अजय शिंदे, व माधुरी भुपेंद्र खैरकर यांचेकडून आमचे अशिल श्रीकृष्ण पांडुरंग सारंग, प्रियांका श्रीकृष्ण सारंग व निकीता श्रीकृष्ण सारंग यांनी कायम खरेदी घेणेचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे रेव्हेन्यु रेकॉर्ड प्रमाणे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे मोहिली तर्फे वरेडी, ता.कर्जत, जि. रायगड येथील जमिनीची मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| २५ | ११/ब | ०.१८.५० | ०-१७ |
| | | पो.ख. ०.०१.५० | |
| | | एकूण ०.२०.०० | |

सदर मिळकत तदंगभुत सर्व हक्कहितसंबंधासह कायम विकत घेणेचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, मृत्युपत्रांकीत दान, साठेकरार, ताबाकब्जा, वहिवाट, पोटगी, लीन, चार्ज, भाडेपट्टा, जाणे येणेचे मार्ग, वारसाहक्क वगैरे तसेच इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यांसह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचे आमचे अशिल समजतील. तसेच कोणाचीही हरकत असल्यास ती त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिली आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती अगर तक्रारी आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पत्ता :- 'श्री सद्गुरु कृपा', १४४ अ,
मु.पो. शेलु, ता. कर्जत, जि. रायगड.
मो. ९८६०६२६२४६

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
खरेदीदार तर्फे ॲडव्होकेट

### कुळअखत्यारपत्र रद्द केल्याची नोटीस

तमाम जनतेस या लेखी नोटीसीने कळविणेंत येते की, आमचे अशिल श्री.डॉमनिक रुझांर फर्नांडीस राहणार-केगाव-खारखंड, उरण तालुका उरण जिल्हा-रायगड यांची वडिलोपार्जित समाईक मालकीची मौजे-चाणजे, तालुका-उरण, जिल्हा-रायगड येथील स.नं.१४७ हिस्सा नं. १ व ७ एकूण क्षेत्र ०-४६-० हे.आर. ह्या मिळकती महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केल्या असून त्या मोबदल्यात १२.५% चा विकसित भूखंड मिळणार आहे, मात्र मे. सारा इंटरप्राईझेसतर्फे श्री. राजेश नामदेव पाटील यांनी आमच्या अशिलांचे अखत्यारपत्र लबाडीने घेतल्याचे समजले म्हणून सदरचे अखत्यारपत्र रद्द केल्याची रितसर नोटीस मे. सारा इंटरप्राईझेस तर्फे श्री. राजेश नामदेव पाटील राहणार घर क्र. ५०४९, मुळेखंड फाटा, करंजा रोड, पंचवटी कॉलनीसमोर, उरण, तालुका उरण, जि. रायगड यांना त्यांचे पत्त्यावर पाठविली आहे. त्यामुळे आमचे अशिलांचे अखत्यारपत्र श्री. राजेश नामदेव पाटील यांचे लाभांत राहिलेले नाही व अस्तित्वात नाही.

सबब सदरचे अखत्यारपत्र आमचे अशिलांनी रद्द केल्यामुळे मे. सारा इंटरप्राईझेसतर्फे प्रोप्रा. राजेश नामदेव पाटील यांना १२.५% भूखंडाबाबत कोणशीही कसल्याही प्रकारचा करार, साठेकरार, आर्थिक व्यवहार विकसित करार अथवा भाडेपट्टा, महसुल शासकीय निमशासकीय, न्यायालयीन कामकाज अथवा इतर कोणत्याही प्रकारची अखत्यारी म्हणून नेमून दिलेली कामे करण्याचा अधिकार दिलेला नाही अथवा राहिलेला नाही, तसे आढळून आल्यास सदरचा कोणताही आर्थिक व्यवहार, करार, साठेकरार, इ. आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही व त्याचे होणारे आर्थिक नुकसानीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग/पनवेल/उरण
तारीख : २४-०५-२०२४

आपला
ॲड. प्रविण म्हात्रे

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे आशिलांनी मौजे खांडपोली तालुका सुधागड जिल्हा रायगड येथील मिळकती त्यांचे मूळ मालक श्री. राजेश गणपत पाठारे रा. खांडपोली, ता. सुधागड, जि. रायगड यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौने खांडपोली ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे क्र./गट क्रं. | खाता नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ३९९ | ६९५ | ०-३६-२० | ६.३३ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त , पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लीज, तबदिल, धारणाधिकार, ताबा, भेट, देवाणघेवाण, विभाजन, शुल्क, ट्रस्ट, वारसा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हक्क, शिर्षक, व्याज, दावा किंवा मागणी असलेल्या आणि दावा करणाऱ्या कोणीही या प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तकारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे मुदतीत सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेणेस योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल व पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यांत येईल. हे तमाम जनतेस कळावे.

ठिकाण :- पाली
दिनांक २४/०५/२०२४

**(ॲड. अमोल रामचंद्र कांबळे)**
मु. पो. पाली ता. सुधागड जि. रायगड
मो. ९०२८२४८५१७

अर्जदाराचे वकील
**ॲड. स्वप्ना पांडुरंग चांदेकर**

### जाहीर नोटीस

**मुरुड येथील मे. तहसिलदार सो. यांचे न्यायालयांत**

क्रि.चौ. अर्ज. ५५/२०२४

महेश कृष्णा जामकर, ...अर्जदार
विरुध्द
मा. मुख्याधिकारी साो.,
मुरुड-जंजिरा नगरपरिषद, ... सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, अर्जदार यांचे वडील कृष्णा महादेव जामकर यांचा जन्म दि. ०३/०६/१९३५ रोजी गांव- मुरुड, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झालेला असून त्यांची जन्म नोंद मुख्याध्याधिकारी मुरुड-जंजिरा नगरपरिषद, ता. मुरुड, जि. रायगड यांचे गा.न.नं. १४ जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड तहसिल न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६९ चे कलम १७ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचे वडील कृष्णा महादेव जामकर यांचा जन्म दि. ०३/०६/१९३५ रोजी झालेबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयांत दि. २५/०६/२००४ रोजी समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांना त्यांच्या वडीलांची जन्म नोंद ही जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरमध्ये होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यांत येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २१/०५/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
**रोहन शिंदे**
तहसिलदार मुरुड-जंजिरा

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहितातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, खालील नमूद मिळकतीचे विद्यमान मालक अरूणा अरविंद माळी रा.मु.पो. केगाव, ता. उरण, जि. रायगड यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे स्नेही यांच्याबरोबर ठरलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| झिराड ता. अलिबाग, जि. रायगड | ४२१ | ०-१६-९० | ३.६० |

वर नमूद मिळकतींपैकी अरूणा अरविंद माळी यांच्या मालकीची ताबेकब्जावहिवाटील अविभक्त हिश्यांच्या मिळकतीची

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे स्नेहीवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २४/०५/२०२४

सही/-
**श्री. किशोर वामन तेलंगे**
रा. श्री साई कन्सल्टंन्सी, दुय्यम निबंधक अलिबाग
कार्यालया समोर गाळा क्र. ३, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९८२२३४८१७३/८८०५३२८६४६

### जाहीर सूचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री लता सदाशिव उर्फ सदानंद म्हसे रा. नालंधे ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१ याच्याकडून कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे नालंधे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४/३/ब एकूण ०.६०.९० पोट खराबा ०.८.३० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक २४/०५/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### शुद्धीपत्रक

मी खाली सही करणार यांनी दिनांक १७/०५/२०२४ रोजीचे दैनिक कृषीवल या वृत्तपत्राचे पान नं. ७ व मौजे-मूशेत, ता. अलिबाग येथील गट नं. ११३/अ/५, एकूण क्षेत्र ०-५४-१५ हे.आर; आकार ५.२९ रू.पै. ही मिळकत, तसेच या मिळकतीवरील ग्रामपंचायत मापगाव १) घर नं. ७५ २) घर नं. २८९/१ व ३) घर नं. २८९/२ या मिळकतींसह या मिळकतीच्या विक्रीबाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सदर जाहीर नोटीसीमध्ये मिळकतीच्या वर्णनामध्ये घर नं. ७५४ असे चुकीने नमूद आहे.

सदर जाहीर नोटीसीतील घर नंबर मध्ये चूक झालेली असून सदर मिळकतीचे वर्णन मौजे-मुशेत, ता. अलिबाग येथील गट नं. १११/अ/५, एकूण क्षेत्र ०-५४-१५ हे. आर; आकार ५.२९ रू.पै. ही मिळकत, तसेच या मिळकतीवरील ग्रामपंचायत मापगाव १) घर नं. ७५ २) घर नं. २८९/१ व ३) घर नं. २८९/२ या मिळकतींसह अशी दुरूस्ती वाचण्यात यावी. याव्यतिरिक्त नोटीशीतील मजकूर जसाच्या तसा वाचण्यात यावा.

अलिबाग
दिनांक : २३/०५/२०२४

सही
**ॲड. संजय दत्तात्रेय म्हात्रे**

### जाहीर नोटीस

दि. २४/०५/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सूचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे निंबोडे, ता. खालापूर, जि. रायगड येथील

| अ.क्र | सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | २६ | १/ब | ०-४८-१ | १-५७ |
| २ | २६ | २/अ | ०-८०-० | ९-३९ |
| ३ | २४ | ३/अ | १-४६-० | २-१३ |
| ४ | १९ | ३/अ | ०-६६-७ | ०-६४ |
| ५ | १९ | २/अ/१ | ०-८०-० | ५-१४ |
| ६ | २२ | १/अ | ०-९९-० | ०-९३ |
| ७ | २० | १/अ | १-१६-२० | १-०९ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकती निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपूर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजून कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
**ॲड. किर्ती नागरा**
कार्या-६०५, सहावा मजला, सी विंग, ईर्स्टन कोर्ट
को. ऑप. सो. लिमिटेड
बरिस्टा रेस्टॉरंट च्या वर, तेजपाल रोड,
विलेपार्ले पूर्व मुंबई ४०० ०५७
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

**निवडक**

## विश्वकरंडक कंपाऊंड तिरंदाजी

**येचॉन :** जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या भारताच्या महिला कंपाऊंड तिरंदाजी संघ विश्वकरंडक स्पर्धेत आपली सुवर्ण मालिका कायम ठेवण्याच्या मार्गावर आहे. येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत भारताच्या महिला संघाने अंतिम फेरीत प्रवेश केला. भारताचा पुरुष कंपाऊंड संघही जागतिक क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे; परंतु त्यांना अपेक्षा पूर्ण करण्यात पुन्हा अपयश आले. त्यांना ब्राँझपदकही मिळवता आले नाही.

## रोनाल्डो रचणार इतिहास

**नवी दिल्ली :** जूनमध्ये युरो २०२४ स्पर्धा खेळवली जाणार आहे. ही स्पर्धा यंदा जर्मनीत होत आहे. या स्पर्धेसाठी पोर्तुगालने आपला २६ खेळाडूंचा संघ जाहीर केला असून त्यात ख्रिस्तियानो रोनाल्डोचीही निवड करण्यात आली आहे. त्यामुळे आता रोनाल्डो सहाव्यांदा युरो स्पर्धेत खेळणार आहे. तो सहाव्यांदा युरो स्पर्धा खेळणारा पहिला खेळाडू आता ठरणार आहे. आतापर्यंत सर्वाधिक पाच युरो खेळण्याचा विक्रम स्पेनच्या इकर कॅलिलास याच्या नावावर होता.

## विकेटकिपर वादाच्या भोवऱ्यात

**लाहोर :** पाकिस्तानचा युवा विकेटकिपर फलंदाज आझम खान पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. त्याचा सोशल मीडियावर एक व्हिडिओ तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओत आझम हा अमेरिकी डॉलर्सने घाम पुसताना दिसत आहे. या व्हिडिओत पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम आणि काही इतर खेळाडू देखील दिसत आहेत. दरम्यान, पाकिस्तानी क्रिकेट चाहते देशातील हालाकीची आर्थिक परिस्थिती पाहता क्रिकेटपटूंनी थोडी तरी संवेदनशीलता दाखवली पाहिजे असं म्हणत आझम खानवर टीका करत आहेत.

## संघ मालकाला अटक

**कोलंबो :** क्रिकेट विश्वात खळबळ उडवणारी एक बातमी समोर आली आहे. ब्रिटनचे नागरिकत्व असलेला मूळ बांगलादेशी तमिम रेहमान हा लंका प्रीमियर लीगमधील दांबुला थंडर्स संघाचा मालक आहे. त्याला मॅच फिक्सिंगसंदर्भातील संयशास्पद हालचालींमुळे अटक करण्यात आली आहे. श्रीलंका क्रीडा मंत्रालयाच्या विशेष तपास टीमने रेहमान याला अटक केली असल्याचे समजत आहे. कोलंबो दंडाधिकारी न्यायालयाने त्याला ३१ मेपर्यंत कोठडी सुनावली आहे.

## नेपाळ संघाला मोठा धक्का

**काठमांडू :** नेपाळ क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. नेपाळ संघाचा अव्वल फिरकीपटू संदीप लामिछाची नुकतेच बलात्काराच्या आरोपातून मुक्तता झाली होती. मात्र, त्याचा अमेरिकेसाठीचा व्हिसा नाकारल्याने त्याला आता टी-२० वर्ल्डकप २०२४ मध्ये भाग घेता येणार नाही आहे. याची माहिती खुद्द संदीप लामिछानेने सोशल मीडियावरून दिली. जे खेळाडू जेलमध्ये गेलेले असतात त्यांना आयसीसीकडून क्लिअरन्स मिळाल्याशिवाय त्यांचा संघात समावेश करता येत नाही.

# राजस्थानकडून बंगळूरूचा ‘रॉयल’ पराभव

**● पहिल्या विजेतेपदाचे स्वप्न भंगले ● पराभवानंतर विराट कोहली भावूक**

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

रॉयल चलेंजर्स बंगळुरु हा आयपीएलमधील एकमेव संघ आहे जो सर्वाधिक वेळा प्लेऑफमध्ये पोहोचला आहे. मात्र, त्यांना विजेतेपद मिळवता आले नाही. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी सेडियमवर देखील त्याचीच पुनरावृत्ती झाली. आयपीएल २०२४ मध्ये एलिमिनेटरची लढत नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडली. अहमदाबादमध्ये झालेल्या मॅचमध्ये राजस्थान रॉयल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला पराभूत केले. सलग सहा विजय मिळवत प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवणाऱ्या फाफ डु प्लेसिसच्या नेतृत्त्वातील बंगळुरुचा पराभव झाला. या पराभवासह आरसीबीचे आयपीएलमधील आव्हान संपुष्टात आले. बंगळुरूने या हंगामात कठोर परिश्रमानंतर पुनरागमन केले होते. पण, आता एलिमिनेटर सामन्यात बंगळूरूला राजस्थानविरुद्ध दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. या पराभवाने बंगळूरूच्या करोडो चाहत्यांचे स्वप्न भंगले आहे.

राजस्थान रॉयल्सने बंगळुरुवर विजय मिळवून क्वालिफायरमध्ये प्रवेश केला आहे. आता राजस्थान रॉयल्स आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात २४ मे रोजी चेन्नईच्या एम. चिदंबरम स्टेडियमवर क्वालिफायर-२ ची लढत होणार आहे. या लढतीमधील विजेता संघ अंतिम फेरीत कोलकाता नाईट रायडर्स विरोधात लढेल.

विराट कोहलीने यंदाच्या आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केली आहे. राजस्थान विरुद्ध झालेल्या सामन्यात पराभव झाल्यानंतर विराट कोहली भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. राजस्थान रॉयल्सने विजय मिळवल्यानंतर दोन्ही संघांच्या खेळाडूंनी हस्तोंदलन केले. यावेळी विराट कोहलीने देखील खेळाडूंची भेट घेतल्यानंतर आयपीएलमधून निवृत्त होत असलेल्या दिनेश कार्तिकला मिठी मारली आणि तो स्टम्प जवळ गेला आणि त्याने बेल्स उडवल्या. विराट कोहलीने एलिमिनेटरमध्ये बंगळुरुला आक्रमक सुरुवात करुन दिली होती. विराटने एक षटकार आणि तीन चौकारासह २४ बॉलमध्ये ३३ धावा केल्या.

यावेळी, प्रथम फलंदाजी करताना बंगळूरूने राजस्थानला केवळ १७३ धावांचे लक्ष्य दिले होते. येथून बंगळूरून सामना सहज हरेल असे वाटत होते. पण बंगळुरूच्या गोलंदाजांनी आपली ताकद दाखवत सामना आल्याकडे झुकवला. त्यामुळे आता बंगळुरू सामना जिंकू शकेल असे वाटत होते, पण अखेरीस बंळुरूला पराभव पत्करावा लागला. पराभवानंतर बंगळुरूचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने याचे कारण सांगितले आहे.



एलिमिनेटर सामना हारल्यानंतर फॅफ म्हणाला की, अनेक संघ १ते ९ जागेवर थांबले होते. परंतु, आम्ही आमचे सर्वोत्तम दिले आणि सर्वांना धक्का बसेल अशा प्रकारे पुनरागमन केले. आम्ही ८ पैकी ७ सामने गमावले होते. असे असूनही, पुनरागमन केल्याबद्दल संघ कौतुकास पात्र आहे. फाफ पुढे म्हणाला की, जेव्हा आम्ही पाहिले की मैदानावर भरपूर दव आहे, तेव्हा आम्हाला वाटले की आम्ही २० धावा कमी केल्या आहेत. या खेळपट्टीवर १८० धावा ही चांगली धावसंख्या ठरली असती. सुरुवातीला चेंडूही स्विंग होत होता. तथापि, नवीन इम्पॅक्ट खेळाडू नियमानुसार या धावसंख्येचा बचाव करणे कठीण होते. गेल्या सहापैकी सहा सामने जिंकून आम्ही चांगले पुनरागमन केले होते. आज आम्ही फलंदाजीत तशी खास कामगिरी दाखवली नाही.

### आठ हजार धावांची नोंद

**विराट कोहलीने आयपीएलमध्ये ८ हजार धावांची नोंद केली आहे. आयपीएलमध्ये ८ हजार धावांचा टप्पा ओलंडणारा पहिला खेळाडू ठरला आहे. विराटने आयपीएलमधील १५ धावांमध्ये ७४१ धावा केल्या आहेत. यात एक शतक आणि पाच अर्धशतके केली आहेत. तसेच, १५४.७० च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आहेत.**

### ऑरेंज कॅप कोहलीच्या नावावर

**बंगळुरुचा संघ जरी आयपीएलमधून बाहेर गेलेला असला तरी ऑरेंज कॅप त्याच्याकडे राहण्याची शक्यता आहे. विराटच्या नावावर ७४१ धावा आहेत. चेन्नई सुपर किंग्जचा कॅप्टन ऋतुराज गायकवाड दुसऱ्या स्थानावर आहे. तर, रियान पराग तिसऱ्या स्थानावर असून त्याने १३ मॅचमध्ये ५६७ धावा केल्या आहेत. ट्रेविस हेड चौथ्या स्थानावर असून १३ मॅचमध्ये ५३३ धावा केल्या आहेत. यानंतर पाचव्या स्थानी संजू सॅमसन असून त्याने ५२१ धावा केल्या आहेत.**

## आक्रमकतेने ट्रॉफी जिंकता येत नाही-रायुडू

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

एलिमिनेटरमध्ये पराभव झाल्यानंतर अंबाती रायुडूने मोठे वक्तव्य केले आहे. त्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. रायुडूने कोणत्याही खेळाडूचे नाव न घेता आक्रमकता आणि सेलिब्रेशनने ट्रॉफी जिंकता येत नाही, असे म्हटले. बंगळूरूने चेन्नईला लीग स्टेजमध्ये पराभूत करत प्लेऑफमध्ये प्रवेश केला होता. बंगळूरूला प्लेऑफमध्ये प्रवेश करण्यासाठी चेन्नईला १८ पेक्षा जास्त धावांनी पराभूत करण्याची गरज होती. बंगळूरूने चेन्नईवर २७ धावांनी विजय मिळवला होता. बंगळूरूच्या विजयासह चेन्नईचे आव्हान संपुष्टात आले होते. चेन्नईला पराभूत केल्यानंतर विराट कोहली आणि बंगळुरुच्या खेळाडूंनी जोरदार सेलिब्रेशन केले होते. विराट कोहलीने सर्वात जास्त सेलिब्रेशन केले होते. विराट कोहलीने त्यावेळी आक्रमकपणे विजयाचा जल्लोष करत होता.

## ‘गार्ड ऑफ ऑनर’ची निवृत्ती

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ मध्ये एलिमिनेटर सामन्यात राजस्थानने बंगळुरुला पराभूत केले. बंगळुरुच्या या पराभवासोबतच भारतीय संघाचा दिग्गज खेळाडू दिनेश कार्तिकचा आयपीएलमधील प्रवास अखेर संपला आाहे. दिनेश कार्तिकला बंगळुरुच्या खेळाडूंकडून ‘गार्ड ऑफ ऑनर’ देण्यात आला. यावेळी मैदानावरील वातावरण भावूक बनले होते.

राजस्थान रॉयल्सने मॅच जिंकल्यानंतर विराट कोहलीने सर्व खेळाडूंसोबत हस्तोंदलन केले. दिनेश कार्तिक समोर येताच विराट कोहलीने त्याला मिठी मारली. अहमदाबादच्या प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून दिनेश कार्तिकचा सन्मान केला. दिनेश कार्तिकने हातातून ग्लोव्हज काढत आयपीएलमधून निवृत्तीचे संकेत दिले. यावेळी राजस्थान विरुद्धची मॅच संपल्यानंतर आरसीबीच्या खेळाडूंनी दिनेश कार्तिकला 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. दिनेश कार्तिक मैदानावरुन ड्रेसिंग रुमच्या दिशेने चालत गेला. त्यानंतर आरसीबीचे खेळाडू त्याच्या मागे चालत गेले. दिनेश कार्तिकने आरसीबीसाठी दिलेल्या योगदानाचा याद्वारे सन्मान करण्यात आला. तो आरसीबीचा



महत्त्वाचा फलंदाज होता. डेथ ओव्हरमध्ये दिनेश कार्तिकची कामगिरी महत्त्वाची असायची. प्लेऑफमध्ये दिनेश कार्तिकची भूमिका महत्त्वाची होती. तसेच, दिनेश कार्तिककडून अद्याप निवृत्तीची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. जगभरातील क्रिकेट चाहते या अधिकृत घोषणेची वाट पाहत आहेत.

## ग्लेन मॅक्सवेल पुन्हा ‘गोल्डन डक’

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ च्या एलिमिनेटर सामन्यात बेंगळुरूचा आयपीएलमधील प्रवास संपला. दरम्यान, या सामन्यात आरसीबीला ग्लेन मॅक्सवेलकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती, पण या सामन्यातही त्याची बॅट शांत राहिली. हा आयपीएल हंगाम मॅक्सवेलसाठी दुःस्वप्नापेक्षा कमी नाही. राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या एलिमिनेटर सामन्यात मॅक्सवेल गोल्डन डकवर बाद झाला.

ग्लेन मॅक्सवेल हा एक स्फोटक फलंदाज म्हणून ओळखला जातो, पण आयपीएल २०२४ मध्ये त्याची बॅट एकदम शांत राहिली. या हंगामात त्याने १० डावात ४३ चेंडूंचा सामना करत फक्त आणि फक्त ५२ धावा केल्या. या हंगामात



मॅक्सवेलचा स्ट्राइक १२० आहे आणि सरासरी ५.८ राहिली. आणि या हंगमाता मॅक्सवेल ४ वेळा खाते न उघडता पॅव्हेलियनमध्ये परतला. मॅक्सवेलला आरसीबीने ११ कोटी रुपयांना खरेदी करून संघाचा भाग बनवला होता. अशा परिस्थितीत, या हंगामात त्याच्या एका धावेची किंमत पाहिली तर ती २,११५,३८५ रुपये आहे.

दरम्यान, ग्लेन मॅक्सवेलच्या आयपीएलमधील कामगिरीवर इरफान पठाण संतापला आहे. मॅक्सवेल शुन्यावर बाद झाल्यानंतर इरफान पठाणने ट्वीट करुन आपला संताप व्यक्त केला आहे. ‘मॅक्सवेल काय करतोय’, असे ट्विट केले आहे.

## पॉन्टिंगचा मुख्य प्रशिक्षक होण्यास नकार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ चा थरार २ जूनपासून रंगणार आहे. आणि विश्वचषक संपल्यानंतर भारतीय संघाचे विद्यमान मुख्य कोच राहुल द्रविड यांचा कार्यकाळ संपणार आहे. अशा परिस्थितीत बीसीसीआय आधीच भारतीय संघासाठी नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात व्यस्त आहे. मुख्य प्रशिक्षक होण्याच्या या शर्यतीत अनेक खेळाडूंचा सहभाग आहे. पण, एकापाठोपाठ एक दिग्गज ही जबाबदारी सांभाळण्यास नकार देत आहेत. राहुल द्रविडने आधीच कार्यकाळ वाढवण्यास नकार दिला आहे.

भारतीय संघाचा पुढील मुख्य



प्रशिक्षक कोण असेल, हा मोठा प्रश्न आहे. दररोज अनेक दिग्गजांची नावे पुढे येत आहेत, जे या पदासाठी शर्यतीत आहेत. यातच आणखी एका दिग्गज खेळाडूने भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक होण्यास नकार दिला आहे. हा दिग्गज खेळाडू दुसरा कोणी नसून ऑस्ट्रेलियाचा विश्वविजेत्या खेळाडू रिकी पॉंटिंग आहे. आयपीएल दरम्यान, ऑस्ट्रेलियाच्या माजी दिग्गजाने हे रहस्य उघड केले आहे.

पॉन्टिंग म्हणाला की, आयपीएलदरम्यान मला भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक होण्यासाठी संपर्क साधण्यात आला होता. माझ्या मुलाची इच्छा आहे की मी ही ऑफर स्वीकारावी, पण मी तसे करणार नाही, कारण ते माझ्या लाइफस्टाइलमध्ये बसत नाही. यासोबत मला माझ्या कुटुंबाला वेळ देता येणार नाही. जर मी भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक झालो तर मी आयपीएल फ्रँचायझीसोबत काम करू शकणार नाही. आणी मी सध्या इतका वेळ देऊ शकत नाही, ही वेळ माझ्या आयुष्यात शोभणारी नाही.

## सचिन खिल्लारीचे सुवर्ण यश

**। कोबे । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्राच्या सांगली जिल्ह्यातील करगणी येथील ३४ वर्षीय सचिन खिल्लारीने येथे सुरू असलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत एफ ४६ गटातील गोळाफेकीत नवीन आशियाई विक्रमासह सुवर्णपदक जिंकताना गेल्यावर्षी जिंकलेले सुवर्णपदक कायम ठेवले. त्याच्या कामगिरीमुळे भारताने जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेतील सर्वोत्तम कामगिरीही पार केली.

भारतीय खेळाडूंनी आतापर्यंत पाच सुवर्णपदकांसह ११ पदके जिंकली असून गेल्यावर्षी पॅरिस येथे झालेल्या स्पर्धेत तीन सुवर्ण,



चार रौप्य व तीन ब्राँझपदके अशी १० पदके जिंकली होती. सचिनने पॅरिस येथे सुवर्णपदक जिंकताना १६.२१ मीटरचा आशियाई विक्रम केला होता.

हा विक्रम इतिहास जमा करताना त्याने येथे १६.३० मीटर अंतरावर गोळा भिरकावला. मंगळवारी भारतीय खेळाडूंनी पाच पदकांची कमाई केली होती. सध्या चीन पदकतालिकेत आघाडीवर तर ब्राझील दुसऱ्या स्थानावर आहे. स्पर्धेचे आणखी तीन दिवस शिल्लक असून भारतीय खेळाडूंना आणखी पदके जिंकण्याची संधी आहे.

> **सुवर्णपदक जिंकण्याचा ठाम विश्वास होता. त्यामुळे आनंदी आहे. या कामगिरीमुळे मी पॅरिस पॅरा ऑलिंपिकसाठी पात्र झालो असून तिथेही सुवर्णपदक जिंकण्याचा विश्वास आहे.**
> **– सचिन खिल्लारी, सुवर्णपदक विजेता.**

## सिंधूची शानदार विजयी सलामी

**। क्लालालंपूर । वृत्तसंस्था।**

विश्रांतीनंतर परतणाऱ्या दोन ऑलिंपिक पदक विजेत्या पी. व्ही. सिंधूने मलेशिया मास्टर्स सुपर बॅडमिंटन स्पर्धेत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. स्कॉटलंडच्या किर्स्टी गिलमोरवर तिने पहिल्या फेरीत सहज विजय मिळवला. सिंधू सध्या जागतिक क्रमवारीत १५ व्या स्थानावर आहे. ऑलिंपिकपूर्वी विश्रांती मिळावी म्हणून तिने उबेर करंडक स्पर्धेतून माघार घेतली होती.

पहिल्या फेरीत तिने गिलमोरवर २१-१७, २१-१६ असा विजय मिळवला. गिलमोर जागतिक क्रमवारीत २२ व्या स्थानावर आहे. सिंधूला विजयासाठी ४६ मिनिटे पुरेशी ठरली. या स्पर्धेत पाचवे मानांकन असलेल्या सिंधूने आपली अखेरची स्पर्धा सिंगापूर ओपन २०२२ मध्ये जिंकली होती. त्यानंतर आतापर्यंत तिला एकही स्पर्धा जिंकता आलेली नाही. आता दुसऱ्या फेरीत



तिचा सामना कोरियाच्या सिंम यू जिन हिच्याविरुद्ध होणार आहे. गिलमोरवर सिंधूने मिळवलेला हा तिसरा विजय आहे. गिलमोर ही राष्ट्रकुल स्पर्धेतील दोनदा पदक विजेती खेळाडू आहे. या सामन्यात तिच्यावर सिंधूचे वर्चस्व अपेक्षित होते. तिने पहिल्या गेममध्ये ७-१ अशी आघाडी घेतली खरी; परंतु गिलमोरने तेवढाच जोरदार प्रतिकार केला आणि १४-१४, १५-१५ अशी बरोबरी साधली. मात्र, सिंधूने पुढे सलग आठ गुण मिळवत पहिला गेम जिंकला.

कोर्टमधील जागा बदलल्यानंतर सिंधूचा खेळ अधिक आक्रमक झाला. तिने गिलमोरला प्रतिकाराची संधी ठेवली नाही. ३-० आणि बघता बघता ११-६ अशी आघाडी घेत आपला विजय निश्चित केला. जुलै महिन्यात होत असलेल्या पॅरिस ऑलिंपिकसाठी सिंधूला फॉर्म मिळणे महत्त्वाचे आहे. गेल्या वर्षी गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तिने जोरदार पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला; परंतु काही सामन्यांत तिला निसटत्या पराभवांना सामोरे जावे लागले. मिश्र दुहेरीत बी सुमीत रेड्डी आणि सिक्की रेड्डी या जागतिक क्रमवारीत ५३ व्या स्थानावर असलेल्या भारतीयांनी दुसऱ्या फेरीत प्रवेश करताना हाँगकाँगच्या लुई चेन वेई आणि फु चेई वॅन यांचा २१-१५, १२-२१, २१-१७ असा ४७ मिनिटांत पराभव केला. सुमीत आणि सिक्की हे पती-पत्नी आहेत.

## इंग्लंड खेळाडू मायदेशी परतण्यावर टीका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

इंग्लंडचे खेळाडू पूर्ण आयपीएलसाठी उपलब्ध असतील, असे आम्हाला सांगण्यात आले होते; परंतु विश्वकरंडक स्पर्धेच्या तयारीसाठी त्यांचे खेळाडू प्ले ऑफच्या अगोदर मायदेशी परतले हे दुर्दैवाचे आहे, अशी निराशा आयपीएलचे आयुक्त अरुण धुमल यांनी व्यक्त केली.

१ जूनपासून सुरू होणाऱ्या ट्वेन्टी-२० विश्वकरंडक स्पर्धेसाठी इंग्लंडने जाहीर केलेला संघ तयारीसाठी पाकविरुद्ध मायदेशात ट्वेन्टी-२० मालिका खेळणार आहे, त्यासाठी जॉस बटलरसह त्यांचे वर्ल्डकप संघातील खेळाडू मायदेशी परतले आहेत. या प्रकारामुळे आयपीएल आयुक्त नाराज झाले आणि त्यांनी दुर्दैवी अशा शब्दात आपले मत व्यक्त केले. या आयपीएलमध्ये आपले सर्व खेळाडू पूर्ण स्पर्धेपर्यंत उपलब्ध असतील, असे इंग्लंड क्रिकेट मंडळाने आम्हाला कळवले होते, असे ते म्हणाले.

इंग्लंड क्रिकेट मंडळाच्या प्रशासनातील व्यक्ती बदलल्या. अगोदरचे प्रशासन आणि आत्ताचे यांच्यामध्ये योग्य संवाद झाला नाही. नव्या प्रशासनातील व्यक्तींना पाकविरुद्धच्या मालिकेची माहिती नसावी आणि त्यांनी अचानक या मालिकेसाठी सर्वोत्तम संघ खेळायला हवा, अशी भूमिका घेतली असावी, असे धुमल यांनी सांगितले.

## साक्षी सुर्यवंशीची ‘बुलेट’ सुसाट

### आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जय्यत तयारी

**। इस्लामपूर । वृत्तसंस्था।**

बाकू (अझरबैझान) मधील वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत ५० मीटर पिस्तूल शूटिंग स्पर्धा प्रकारात सुवर्णपदक पटकावलेल्या साखराळे (वाळवा) येथील साक्षी सूर्यवंशीची ‘बुलेट’ सध्या सुसाट आहे.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी साक्षीची तयारी सुरू असून, आता त्या दिशेने तिचा प्रवास सुरू आहे. ५० मीटर पिस्तूल शूटिंग स्पर्धा प्रकारात साक्षीने टियाना (हरयाना) आणि करणदीप कौर (पंजाब) या सहकाऱ्यांच्या सोबतीने भारताला सुवर्णपदक मिळवून दिले होते. या यशाने सांगली जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीयस्तरावर चमकले आणि वाळवा तालुक्याच्या






लौकिकातही भर पडली. तसेच, साक्षीला आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या देशासाठी अव्वल कामगिरी करायची आहे. त्यासाठी तिची तयारी सुरू आहे.

बाकू येथे ५१ देशांच्या सहभागातून झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील तिच्या यशानंतर तिला चांगली संधी चालून येत आहेत. साक्षी अत्यंत जिद्दी आणि मेहनती आहे. सध्या कोल्हापुरात तिचा रोज आठ-दहा तासांचा सराव सुरू आहे.

> आंतरराष्ट्रीय पातळीवर ऑलिंपिक स्पर्धेत सहभागी होऊन भारताचे नाव उज्ज्वल करायचे ध्येय आहे. १० मीटर, २५ मीटर आणि ५० मीटर पिस्तूल शूटिंगचा नित्यनेमाने सराव सुरू आहे. आजपर्यंतच्या माझ्या प्रवासात अनेकांनी साथ दिली, त्या सर्वांचा विश्वास सार्थ ठरवायचा आहे.
> - साक्षी अनिल सूर्यवंशी

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)